सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ८ डिसेंबर | वर्ष ३ रे | अंक २४२ | पाने : ८ | किंमत रू. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**सोयगाव, दि.७ डिसेंबर -**

येथील कै.बाबुरावजी काळे शाळेत ६ डिसेंबर रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या पुण्यतीथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक निलेश पाटील यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्रतिक्षा विजय पगारे (इ.१० वी), प्रणवी पगारे (इ.८ वी), जान्हवी पगारे (इ.२ री) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.त्याचप्रमाणे शाळेच्या शिक्षिका रुपाली मानकर, मुख्याध्यापक निलेश पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### गुरुकथा कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.७ डिसेंबर -**

महाराष्ट्र हिमालयन ध्यान योग संस्थेतर्फे गुरुकथा कार्यक्रमाचे आयोजन १०, ११ व



१२ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ५.३० ते ७.३० करण्यात येत आहे. हा कार्यक्रम सप्तपदी मंगल कार्यालय, अयोध्या नगर N-८ CIDCO, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कथाकार श्री मोहितभाई आपल्या कथेत सांगतात. गुरु कोण आहे? त्यांची ओळख कशी करायची? आपल्या आध्यात्मिक जीवनात गुरुची गरज का असते? आणि आजच्या काळात खरा गुरु कोण? आपण स्वतःचा गुरु कसा ओळखू शकतो? या सर्व गूढ आणि महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे गुरुकथा मध्ये मिळतील. कथाकार मोहितभाई कथेच्या शेवटच्या दिवशी प्रत्यक्ष ध्यानाचा अनुभव पण देतात.



### श्वेता कासलीवाल यांनी १८५ कि.मी. ची सायकल यात्रा

**छत्रपती संभाजीनगर, दि.७ डिसेंबर -**

नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जैन टॅग ग्रुपच्या अध्यक्षा श्वेता राजेश कासलीवाल हिने दिगंबर जैन सिध्द क्षेत्र कुंथलगिरी येथे जाउैन भगवंताचे दर्शन घेतले. दिगंबर जैन समाजातील पहिल्या महिला जिने वयाच्या ४१ व्या वर्षी आपल्या जिददीवर तब्बल १८५ कि.मी. सायकल यात्रा केली. दि.२८ नोव्हेंबर रोजी शहानुमियाँ दर्गा येथुन सुरैवात करैन थेट बिड येथे १२५ कि.मी.वर जाउैन मुक्काम केला नंतर दि.२९ नोव्हेंबर रोजी ६० कि.मी. अंतर सायकल वर पुर्ण केले. यावेळी त कुंथुलगिरी येथे जाउैन भगवंताची पुजा आरती केली. यावेळी राजेश कासलीवाल, रौनक ठोले, सचिन कासलीवाल, विजय पाटोदी, संकेत पहाडे यांनी सुध्दा छत्रपती संभाजीनगर ते कुथलगिरी पर्यत साकल यात्रा केली. आर्यनंदी कॉलनी व छत्रपती संभाजीनगर जैन समाजाच्या वतीने सुध्दा श्वेता कासलीवाल व सायकल स्वारांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

# राज्याच्या राजकारणात पुन्हा 'गरमी'; नागपुरात आजपासून वादळी हिवाळी अधिवेशन

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार; फडणवीस सरकारला घेरण्याची रणनीती आखणी



**तभा वृत्तसेवा**
**नागपूर, दि.७ डिसेंबर -**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा तापमान वाढण्याची चिन्हे दिसत असून, राज्याचे बहुप्रतिक्षित हिवाळी अधिवेशन आजपासून (८ डिसेंबर) उपराजधानी नागपूर येथे सुरू होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन अत्यंत म हत्त्वाचे आणि वादळी ठरण्याची दाट शक्यता आहे.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म हाविकास आघाडीने सरकारतर्फे आयोजित पारंपरिक चहापान कार्यक्रम ावर बहिष्कार टाकत आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळे अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच सत्ताधारी आणि विरोध कांमध्ये राजकीय संघर्ष उफाळून आला आहे. विरोधकांनी हा बहिष्कार राजकीय निषेधाचा प्रतीकात्मक पण ठोस संदेश असल्याचे सांगत, अधिवेशनात सरकारला पूर्ण ताकदीने घेरण्याची तयारी दर्शवली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावत सरकारची भूमि का स्पष्ट केली आहे.

राज्यातील जनतेशी संबंधित प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी सरकार पूर्णपणे सज्ज आहे. विरोधकांनी उपस्थित केलेले सर्व विषय नियमानुसार सभागृहात मांडले जातील आणि त्यावर उत्तर दिले जाईल, असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

एकूणच, नागपुरातील हिवाळी अधिवेशन केवळ चर्चा-सत्र न राहता, आगामी राजकीय समीकरणांची नांदी ठरणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### चहापान बहिष्कारामागे अनेक मुद्द्यांची साखळी...

महापरिनिर्वाण दिनानिमित्त (६ डिसेंबर) चैत्यभूमीवर झालेल्या कथित गैरव्यवस्थापनाचा मुद्दा, राज्यातील शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, वाढती बेरोजगारी, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका - या सर्व म ुद्द्यांवर सरकारला जाब विचारण्यासाठी विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकल्याचे स्पष्ट केले आहे.

### मराठा आरक्षण, दुष्काळावरून सभागृह तापण्याची शक्यता...

मराठा आरक्षणाचा संवेदनशील प्रश्न, दुष्काळसदृश परिस्थिती, शेतकरी कर्जमाफी, रोजगारनिर्मिती आणि नागरी निवडणुकांचे आरक्षण या मुद्द्यांवर अधिवेशनात तीव्र संघर्ष होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे हे अधिवेशन राजकीय अजेंड्यांच्या दृष्टीने तसेच सत्ताधारी-विरोधक शक्तिप्रदर्शनासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### कोकणच्या 'हापूस'वर गुजरातचा दावा...

# जीआय टॅगसाठीच्या अर्जाला उत्पादकांचा तीव्र विरोध!

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि.७ डिसेंबर -**



जगप्रसिद्ध कोकणच्या हापूस आंब्यावर एक मोठे संकट ओढावले आहे. गुजरात राज्याने 'वलसाड हापूस' या नावाने भौगोलिक संकेत (जीआय टॅग) मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असून, या दाव्याला कोकणातील आंबा उत्पादक आणि विक्रेत्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

कोकणच्या हापूस आंब्याला २०१८ मध्ये जीआय टॅग मिळाला आहे, ज्यामुळे या आंब्याला बाजारात एक विशिष्ट ओळख आणि कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. गुजरातच्या गांधीनगर आणि नवसारी कृषी विद्यापीठांनी २०२३ मध्ये 'वलसाड हापूस' साठी जीआय टॅगचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया सुरू असून, ३० ऑक्टोबर रोजी पहिली सुनावणी पार पडली आहे.

कोकण हापूसला मिळालेला जीआय टॅग केवळ ओळखपत्र नसून, तो या आंब्याची गुणवत्ता आणि बाजारपेठेतील उच्च स्थान टिकवून ठेवण्यासाठी एक आधारस्तंभ आहे. गुजरातचा हा दावा कोकणातील शेतकऱ्यांसाठी मोठा धक्का मानला जात आहे, कारण यामुळे कोकण हापूसच्या विशिष्ट दर्जाला आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

डॉ. भिडे यांनी स्पष्ट केले की, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि महाराष्ट्राच्या इतर भागांतील आंबे अनेकदा 'कोकण हापूस' म्हणून विकले जातात. या भेसळीला आळा घालण्यासाठी क्यूआर कोड प्रणालीही आणण्यात आली होती, परंतु फसवणूक अजूनही सुरूच आहे. अशा परिस्थितीत गुजरातचा हा नवा दावा कोकणच्या हापूस उत्पादकांसाठी अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे.

कोकण आंबा उत्पादक आणि विक्रेता संघाचे अध्यक्ष डॉ. विवेक भिडे यांनी गुजरातच्या या दाव्याला जोरदार विरोध केला आहे.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**सिल्लोड, दि.७ डिसेंबर -**

आ. अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली सिल्लोड तालुक्यातील विविध गावांमध्ये मंजूर व पूर्ण झालेल्या तसेच नव्याने प्रस्तावित अशा सुमारे ८ कोटी ५० लाख रुपये खर्चाच्या विकास कामांचे भूमि पूजन व लोकार्पण सोहळे रविवार, दि.७ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. सदर उपक्रमांमुळे तालुक्यातील पायाभूत व मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणास गती मिळणार असून समावेशक ग्राम ीण विकासाला चालना मिळणार आहे.



मोढा बुद्रुक, वांगी खुर्द, भराडी, बोरगाव बाजार, सावखेडा, देऊळगाव बाजार, घाटनांद्रा, आमठाणा, शिंदेफळ, कोटनांद्रा, अंभई, खुल्लोड व डोंगरगाव या गावांमध्ये विविध सभागृहे, आरोग्य उपकेंद्रे, रस्ते, पाणीपुरवठा योजना, स्मशानभूमी शेड, शाळा खोल्या व इतर सार्वजनिक सुविधांची कामे सुरू अथवा लोकार्पित करण्यात आली.

याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधत येत्या आर्थिक वर्षात मतदारसंघातील उर्वरित विकास काम ांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची स्पष्ट ग्वाही दिली. सिल्लोड मतदारसंघात विकास निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे ठाम आश्वासन देत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व कामे निर्धारित कालमर्यादेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या.

कार्यक्रमास जिल्हा बँक चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी उपसभापती अजीज बागवान, पंचायत समिती उपसभापती संदीप राऊत, गणेश गरुड, डॉ. संजय जामकर आदींसह विविध गावांचे लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी परिक्रमेसाठी संत महंत पैठण नगरीत मोक्ष घाटाला कुंभ मेळाव्याचे स्वरूप





**तभा वृत्तसेवा**
**पैठण, दि.७ डिसेंबर -**

श्रीअग्रपीठाधीश्वर एवं म लूकपिठाधीश्वर पु.पु. श्री स्वामी राजेन्द्र दास महाराज (श्रीधाम वृंदावन) यांच्या पुढाकारातून नाशिक येथून प्रारंभ झालेल्या १५ दिवसीय, २६८१ कि.मी. लांबीच्या भव्य गोदावरी परिक्रम ेच्या दुसऱ्या दिवशी परिक्रमा मंडळाचे पैठण येथे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

या दिव्य यात्रेत ५०० संतांचा समावेश असून त्यामध्ये प्रामुख्याने प.पु. रसिकाचार्य श्रीश्री किशोरदास देवजू महाराज (गौरीलाल कुंजवाले) तसेच आंतरराष्ट्रीय कथा वाचक श्री चिन्मयानंदजी बापू यांसारख्या मान्यवर संतांचा सहभाग होता.

पैठण आगमनानंतर स्वामी राजेंद्र दासजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली हजारो संत महंतांनी गोदावरी तीर मोक्ष घाटावर जल पूजन करून गंगास्नान करण्यात आले.

त्यानंतर माहेश्वरी भक्त निवास येथे आयोजित प्रवचनात महाराजांनी गोदावरीचे आध्यात्मि क, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व तसेच गोदावरी परिक्रमेचे पुण्यफळ यावर विशेष प्रकाश टाकला. पैठणचे आ. विलास बापू भुमरे यांनी आलेल्या संतांचे स्वागत करून आशीर्वाद घेतले.

संतांच्या उपस्थितीने संपूर्ण पैठण नगरी भक्तिमय झाली असून स्थानिक भक्त, नागरिक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या धार्मिक सोहळ्याने पैठण नगरी तसेच मोक्ष घाटाला कुंभम ेळ्यासारखे स्वरूप प्राप्त झाले होते.

# ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, दि.७ डिसेंबर -**

पंचायत समिती सोयगाव अंतर्गत जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, सोयगाव यांच्या नीटनेटक्या नियोजनात ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन अत्यंत मंगल वातावरणात उत्साहाने पार पडले. या प्रदर्शनाने विज्ञानाची दिशा, तंत्रज्ञानातील प्रगती आणि विद्यार्थ्यांची सर्जनशीलता यांची प्रभावी मेजवानी दिली.

यामध्ये विविध शाळांतील हुशार विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, ऊर्जा व्यवस्थापन, कृषी तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि नवनवीन डिजिटल कल्पना अशा विषयांवर दर्जेदार मॉडेल्सचे सादरीकरण केले. प्रत्येक प्रकल्पातून वैज्ञानिक कुतूहल आणि समस्या सोडवण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून आली.

गटविकास अधिकारी कार्यालयाचे पाटील, केंद्रप्रमुख फिरोज तडवी, जनार्धन साबळे यांसह गटसाधन केंद्राचे विशेष तज्ज्ञ उपस्थित होते. पर्यवेक्षक टीम - डॉ.एस.एल.पाटील, आर.टी.जाधव, टि.आर शेख यांनी काटेकोर म ूल्यांकन करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली. केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक करून विज्ञानाधारित शिक्षणाची गरज अधोरेखित केली.

या प्रदर्शनामध्ये प्राथमिक गटातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमि क शाळा, सोयगाव येथील प्राची सोनवणे, शुभ्रा सोहनी, जयश्री कोळी यांनी तयार केलेल्या 'शाश्वत शेती उपकरणा'ला प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांची निवड जिल्हास्तरावर झाली आहे.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक किरणकुमार पाटील व शिक्षक रामचंद्र महाकाळ यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांक मि ळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, केंद्रप्रमुख फिरोज तडवी, पालक आणि गावकऱ्यांनी



त्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक किरण पाटील यांनी संपूर्ण नियोजन स्वतः पाहून प्रदर्शन शिस्तबद्धपणे पार पाडल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक झाले. एकूणच, हे प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला प्रेरणा देणारे आणि विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीचा संदेश देणारे ठरले.



# 'परीक्षा पे चर्चा' साठी तयारीला वेग

## विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी PM मोदी लवकरच संवादात; नोंदणी प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नवी दिल्ली, दि.७ डिसेंबर -**

विद्यार्थी जीवनातील परीक्षांचा ताण कमी करणे आणि सकारात्म क मानसिकता निर्माण करणे या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्यातर्फे घेण्यात येणारा बहुप्रतिक्षित 'परीक्षा पे चर्चा' हा विशेष कार्यक्रम लवकरच आयोजित केला जाणार असून, त्यासाठीची तयारी केंद्र सरकारकडून अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

'परीक्षा पे चर्चा' हा केवळ संवादात्मक कार्यक्रम नसून, परीक्षेला सामोरे जात असलेल्या कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी मानसिक आधार देणारा राष्ट्रीय उपक्रम म्हणून तो ओळखला जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पंतप्रधान मोदी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या नोंदणीतून निवडक विद्यार्थ्यांना पंतप्रधानांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते. याशिवाय शिक्षक आणि पालकही या संवादात सहभागी होऊ शकतात, ज्यामुळे शिक्षण प्रक्रियेतील तिन्ही घटकांमध्ये समन्वय साधण्याचा उद्देश स्पष्ट केला जात आहे. चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी 'तणावमुक्त परीक्षा', वेळेचे प्रभावी नियोजन, एकाग्रता वाढवण्याचे उपाय, आत्मविश्वास आणि यशस्वी जीवनदृष्टी यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करतात. प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे दिले जाणारे हे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मानसिक बळ देणारे ठरत आहे.

दरम्यान, शिक्षण मंत्रालयाच्या वतीने या कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि तयारी युद्धपातळीवर सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### 'मागेल त्याला सोलार पंप'...

# उपक्रमामुळे कृषी कार्यक्षमता आणि ग्रामीण परिवर्तनाच्या दिशेने राज्याचे पाऊल

**तभा वृत्तसेवा**
**छ. संभाजीनगर, दि.७ डिसेंबर-**

महाराष्ट्र शासन व म हावितरणच्या 'मागेल त्याला सोलार पंप' या फ्लॅगशिप उपक्रमाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवत राज्याची अंमलबजावणी क्षमता जागतिक व्यासपीठावर अधोरेखित केली आहे.

केवळ एका महिन्यात राज्यात ४५,९११ सौर पंपांची यशस्वी स्थापना करण्यात आली असून, हा जलसिंचन उपकरणांच्या सर्वाधिक आणि वेगवान स्थापनेचा जागतिक विक्रम ठरला आहे. या यशात शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने ८,८४६ सौर पंप बसवत सर्वाधिक योगदान नोंदवले. त्यामुळे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स अंतर्गत सर्वाधिक सहभागी कंपनी म्हणून शक्ती पंप्सचा विशेष गौरव करण्यात आला. या कामगिरीमुळे सौर पंप व स्मार्ट जल व्यवस्थापन क्षेत्रातील कंपनीचे नेतृत्व स्थान अधिक दृढ झाले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना दिवसा स्वच्छ सौरऊर्जेवर विश्वासार्ह जलसिंचन तर रात्री घरगुती वापरासाठी मोफत वीज उपलब्ध होत असून, कृषी उत्पादन खर्चात मोठी बचत होत आहे.

स्वच्छ ऊर्जा, वाढलेली कृषी उत्पादकता आणि ग्राम ीण भागातील दीर्घकालीन परिवर्तनाच्या दिशेने राज्याने ठोस आणि परिणामकारक पाऊल टाकल्याचे या विक्रमामुळे प्रकर्षाने समोर आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालयांमध्ये १३ डिसेंबरला होणार लोक अदालत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर लोकन्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपले प्रकरणे तडजोडीसाठी ठेवावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व.स्तर डब्ल्यू. ए. सय्यद यांनी केले आहे.

या पूर्वी दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या लोकन्यायालयामध्ये संपूर्ण बीड जिल्हयातून प्रलंबित व दाखलपूर्व असे एकूण ४७,५५८ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी १३०१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये जवळपास १५ कोटी ६८ लाख ६६ हजार ६०५ रूपयांच्या प्रकरणामध्ये तडजोड झाली. सदरचे लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जिल्हा वकील संघ व सर्व तालुका वकील संघ, पदाधिकारी, विधिज्ञ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.त्याप्रमाणे येणा-या १३ डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोकन्यायालयाबाबत बोलताना न्यायाधीश डब्ल्यू. ए. सय्यद म्हणाले की, लोक अदालतच्या निवाडयाविरूध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो, लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकुमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणा-या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते. आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होउन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत असे आवाहन न्यायाधीश सय्यद यांनी केले आहे.

# पी.एम. किसान योजना : लाभ संशयीत कुटूंबाची व अल्पवयीन लाभार्थीची पडताळणी करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

राज्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६०००/- रुपयांची अर्थिक मदत दिली जाते. योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत २१ हप्त्यांद्वारे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना रक्कमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे,

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य केंद्रशासीत प्रदेशातील जमीनीच्या नोंदीप्रमाणे लागवडीयोग्य जमीनधारक एका शेतकरी कुटुंबातील (पती, पत्नी आणि अल्पवयीन मुले) फक्त एक सदस्य योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहे.पुर्वीच्या जमीन धारकांच्या मृत्यूनंतर वारसाहक्कामुळे दि.०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन हस्तांतरीत झाली आहे. असे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. तसेच इतर कारणांनी (वाटणीपत्र, खरेदी, बक्षीसपत्र, इ.) दि ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, पी एम किसान योजनेमध्ये लाभार्थी समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या पात्रतेचे सत्यापन करून कोणताही अपात्र लाभार्थी योजनेमध्ये समाविष्ट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

यासाठी केंद्र शासनाने पी एम किसान योजनेच्या लाभार्थीची डेटा पडताळणी केली असता या प्रक्रीयेअंती काही विसंगती समोर आलेल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये असे आढळून आले आहे की, एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्याना लाभ मिळत आहे. याशिवाय ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या काही लाभार्थ्यांनी चुकीची माहीती दिलेली आहे. या चुकीच्या बाबींचे निराकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडून अशा लाभार्थ्यांचे प्रामुख्याने खालील चार प्रकारांमध्ये लाभ तात्पुरते रोखण्यात आले आहेत. १. एकाच कुटूंबातील एकाहून अधिक सदस्य लाभ घेत असल्याचे संशयित प्रकरणे (पती पत्नी किंवा अल्पवयीन अपत्ये) २. जुना व सध्याचा जमीनधारक दोघेही लाभार्थी असलेली प्रकरणे (दि.०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) ३. जुन्या जमीनधारकांचे चुकीचे किंवा अमान्य तपशील असलेली संशयित प्रकरणे (दि. ०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) ४. जमीन हस्तांतरणाचे चुकीचे कारण नमूद केलेली संशयित प्रकरणे (दि. ०१.०२.२०१९ नंतरचे जमीनधारक) वरीलप्रमाणे संशयित प्रकरणांच्या वर्गवारी नुसार पाटोदा तालुक्यातील संशयित (Suspected) लाभार्थींची एकूण संख्या ४३ इतकी असून या सर्व संशयित प्रकरणांची सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मार्फत भौतीक तपासणी करून व योजनेच्या निकषांनुसार पात्रता तपासण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे (पती-पत्नीचे आधारकार्ड, जमीन नोंदीचा फेरफार, सातबारा उतारा (६ महिन्याचे आतील), रेशनकार्ड तसेच वारसनोंदी साठी मयत व्यक्तीचा फेरफार व मृत्यू प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे तपासणीसाठी तालुका कृषि अधिकारी, पाटोदा कार्यालयात सादर करावी किंवा गावचे सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडे देण्यात यावी. सहाय्यक कृषि अधिकारी हे सदरील शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून शेतकरी योजनेस पात्र/अपात्र असलेबाबत पडताळणी करून पुढील कार्यवाहीसाठी सादर करतील. व तालुक्याचा एकत्रित अहवाल जिल्हा कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल. सदरील संशयित प्रकरणाच्या यादया संबंधित गावचे सहाय्यक कृषी अधिकारी यांचे मार्फत ग्रामपंचायत कार्यालयाचे बोर्डवर लावण्यात येणार आहेत.

# शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा शासनाने विचार करावा

## आ.संदिप क्षीरसागरांची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झालेले आहेत. आ.संदिप क्षीरसागर यांनी सदरील आंदोलनाची दखल घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी राज्य शासनाकडे केली आहे.



मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ढएढ विषयक अनिवार्यतेच्या निर्णयास अनुसरून पुर्नविचार याचिका दाखल करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमीत वेतन श्रेणी लागू करावी, शिक्षकांनाही १०, २०, ३० वर्षांनंतरची सुधारीत तीन वेतन लाभाची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, १५ मार्च २०२४ चा संचमान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा, राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बंद असलेली पदभरती तात्काळ सुरू करावी, विषय पदविधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मध्ये भेदभाव न करता मंजुरी द्यावी इ. मागण्यांसाठी महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले आहे. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी शनिवारी (दि.०५) रोजी शाळाही बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे गेल्या अनेक दिवसांपासुन विविध माध्यमातुन आंदोलन करत आहेत. शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक घटक आहे. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागण्यांचा संवेदनशीलपणे आणि सकारात्मकपणे विचार करावा असे आ.संदिप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. या संदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री तसेच शालेय शिक्षणमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे महापरिनिर्वाण दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

हा दिवस दरवर्षी ६डिसेंबर रोजी पाळला जातो.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या देशासाठी ,संविधानासाठी आणि शोषित समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या अमूल्य कार्याचे स्मरण आणि त्यांना आदरांजली वाहने हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे . शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा असा महान संदेश त्यांनी दिला .ते भारतीय राज्यघटनेचे जनक आहेत .अतिशय प्रतिकूल वातावरणात देखील शिक्षणाची कास धरून ३२ पदव्या आणि ९ भाषांवर प्रभुत्व मिळवले .विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण ,वेळेचे नियोजन ,सातत्य अशा विविध गुणांचा अंगीकार करावा .डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणातून समाजाला दिलेली शिकवण आणि विचार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासातून आपल्या जीवनातील ध्येय प्राप्त करावीत .



# सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल अंबाजोगाई पिपल्स बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या संदर्भात ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशनच्या वतीने ही माहिती बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांना देण्यात आली आहे. रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण पुणे येथे आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

येथील अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले. यासाठी शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५' ने ही गौरविण्यात आले आहे हे विशेष होय. तसेच आता जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' नुकताच घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सहकार सभागृह, कॉसमॉस सहकारी बँक लि.मुख्य प्रशासकीय कार्यालय, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जागतिक सहकार वर्षाचे औचित्य साधून सहकार क्षेत्रातील विविध घटकांनी एकत्र येऊन अनुभवविनिमय, विचारमंथन व आगामी दिशानिर्देशासाठी धोरणात्मक चर्चासत्रे आयोजित करण्याच्या उद्देशाने ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन-२०२५' ही सहकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सहकारी गृह रचना संस्था, सहकारी दूध उत्पादक संघ व सहकारी साखर कारखाने अशा विविध सहकार क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई पिपल्स बँकेने कर्ज वितरणाद्वारे छोट्या उद्योगांना, सूक्ष्म व मध्यम उद्योजकांना, सहकारी संस्था तसेच विविध उद्यमशील व्यक्तींना भांडवल उपलब्ध करून देत त्यांच्या व्यवसाय व उत्पन्न वृद्धीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. कर्ज पोर्टफोलिओचे सुयोग्य नियोजन, व्यवस्थापनातील सक्षम धोरण, आर्थिक पारदर्शकता, वेळोवेळी सभासदांना लाभांश वितरण, तसेच रिझर्व्ह बँकेच्या सर्व वैधानिक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून अंबाजोगाई पिपल्स बँकेने सुदृढ, विश्वासार्ह व स्थिर आर्थिक संस्थेचे आदर्श मॉडेल निर्माण केले आहे. या आदर्श कार्यपद्धती, सभासद हित संवर्धन आणि सुयोजित आर्थिक व्यवस्थापनाचा अभ्यास करून आपल्या अंबाजोगाई पिपल्स बँकेची 'ग्रीन वर्ल्ड को प्राईड-२०२५' या प्रतिष्ठेच्या सन्मानासाठी निवड करण्यात आलेली आहे. याबद्दल आपल्या संस्थेस हार्दिक अभिनंदन. असे गौतम कोतवाल (अध्यक्ष, ग्रीन वर्ल्ड, पुणे) यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेस कळविले आहे. या संदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अंबाजोगाई पिपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पिपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली आहे. यंदा ३० सप्टेंबर २०२५ अखेर बँकेने ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या प्रगतीचा आलेख आजतागायत उंचावलेला असून यावर्षी २४ मे २०२५ रोजी बँकेच्या स्थापनेस २९ वर्षे पूर्ण झाली आहेत. दिवसेंदिवस बँकेचे कामकाज वाढत आहे, त्यामुळे सभासद, ठेविदारांचा बँकेवरचा विश्वास वाढत आहे. आहेत. सामाजिक बांधिलकीतून पिपल्स बँक आज बँकींग क्षेत्रात कार्यरत आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात बँकेच्या मुख्य कार्यालय व दोन विस्तारीत शाखांसह एकूण १८ शाखा कार्यरत आहेत. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या आणखी ३ नवीन शाखा सुरू झाल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्र हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे. बँकेच्या सर्व शाखा या संगणकीकृत आहेत. यूपीआय ही सुविधा देणारी अंबाजोगाई पिपल्स बँक ही शहरातील पहिली बँक ठरली आहे. आज बँकेचे स्वतःचे अत्याधुनिक डाटा सेंटर आहे. तत्पर, विनम्र आणि दर्जेदार बँकींग सेवा ही बँकेची ओळख आहे. ३० जुन २०२५ अखेर बँकेची सभासद संख्या - १२९३८ एवढी आहे. बँकेकडे ६१२ कोटी एवढ्या ठेवी, भागभांडवल - २० कोटी, तर स्वनिधी- ५० कोटी एवढा आहे. बँकेने तब्बल ३३४ कोटी रूपयांचे कर्ज वाटप केले आहे. ३३७ कोटी रूपयांची गुंतवणूक ही केली आहे. बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर ४ कोटी ७२ लाख रूपयांचा नफा झाला आहे. बँकेने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर विविध सामाजिक, विधायक आणि लोकोपयोगी उपक्रम राबविले होते हे उल्लेखनीय आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने गरूडझेप घेत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला. यासाठी बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, मुख्यकार्यकारी अधिकारी, वरीष्ठ अधिकारी, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी, पिग्मी एजंट यांनी केलेल्या उत्तम टीम वर्कचेच हे फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध करून देत आर्थिक वर्षात आपला एनपीए शुन्य टक्के ठेवण्याचा, कमीत-कमी राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे, यासाठीच काटेकोरपणे काम करीत बँकेकडून एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले जाते. अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने ही आपला एनपीए हा कमीत-कमी राखण्याचा, ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न प्रत्येक आर्थिक वर्षात केलेला आहे. अंबाजोगाई पिपल्स बँकेने एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने नुकतेच अंबाजोगाई पिपल्स बँकेला एनपीएचे सर्वोत्तम व्यवस्थापन करणारी शहरी सहकारी बँक या गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार' देवून गौरविण्यात आले ही गौरवपूर्ण बाब आहे. पुढे बोलताना बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने सुरूवातीपासून एनपीए कमीत-कमी राखला आहे. सर्वच शाखांतून बँकेमार्फत ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एईपीएस, तसेच युपीआय सारख्या अद्ययावत सुविधा देखील पुरविण्यात येत आहेत. बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, सर्व संचालक श्री.वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, अरूण काळे, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, श्रीमती वनमाला रेड्डी, संकेत मोदी, सौ.स्नेहा हिवरेकर, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद व पिग्मी एजंट यांचे सातत्यपूर्ण सहकार्य व योगदान आहे. अशी माहिती चेअरमन मोदी यांनी दिली. अंबाजोगाई पिपल्स बँकेस 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल सर्वस्तरांतून बँकेचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



**अंबाजोगाई पिपल्स बँकेवर ग्राहकांचा विश्वास :**

अंबाजोगाई पिपल्स बँकेने आपल्या ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच बँक सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करीत वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक यांच्या बँकींग गरजा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. अंबाजोगाई पिपल्स ही ग्राहकांची आपली हक्काची व त्यांचे हित जपणारी ही बँक असून बँकेने ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला तसेच एनपीएचे व्यवस्थापन ही सर्वोत्तम केले याचा आपणा सर्वांनाच आंनद आहे. सर्वांनी बँकेच्या अभिनव सेवांचा आणि सुविधांचा पूर्णपणे उपयोग करावा असे आवाहन करून यापुढील काळात ही अंबाजोगाई पिपल्स बँक सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतक या सर्वांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही देतो.

– राजकिशोर मोदी
(चेअरमन, अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक)

# नाशिक कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करू नका, टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामांची सक्ती करण्यात येवू नये

## समाजवादी पार्टीच्या मुख्यमंत्र्यांकडे मागण्या

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

नाशिक जिल्ह्यातील कुंभमेळ्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करू नका तसेच टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामे सक्ती करण्यात येवू नयेत अशा मागण्या समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.शिवाजी कांबळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना उपजिल्हाधिकार्यांमार्फत गुरूवार, दि.०४ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

समाजवादी पार्टीच्या वतीने देण्यात आलेल्या २ वेगवेगळ्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक जिल्ह्यातील कुंभमेळ्यासाठी साधु व संतांना थाबण्यासाठी तपोवन येथील वृक्षतोड करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे व सदर वृक्षतोड करण्यात येवू नये म्हणून सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांनी सुरू केलेले आंदोलन योग्य असुन सदर वृक्षतोड करण्यात येवू नये, सदर वृक्षतोड झाल्यास त्या भागात ऑक्सिजनची कमतरता निर्माण होवून मानव जातीस ते अपायकारक असणार आहे. महाराष्ट्र सरकारचे पर्यावरण विभागाने याची दखल घेण्यात यावी. तसेच संपुर्ण महाराष्ट्रातून या मागणीस पाठींबा मिळत आहे. तरी समाजवादी पार्टी सदर मागणीस जाहीर पाठींबा देत असून सदर वृक्षतोड करण्याचा निर्णय चुकीचा आहे. तो रद्द करण्यात यावा तसेच महाराष्ट्रामध्ये सरकारकडून शैक्षणिक धोरण राबवित असताना



जे शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. ज्यांची नौकरीची फक्त चार-पाच वर्षेच राहीले आहेत. त्यांना टीईटी परीक्षेमधून वगळण्यात यावे व टीईटी सक्ती, अन्यायकारक संच मान्यता धोरण, अशैक्षणीक कामे, जुनी पेन्शन योजना, शिक्षकेत्तर कर्मचारी बंद असलेली पदे भरती, कमी पटाच्या शाळा बंद करण्याचे शासनाचे धोरण अन्यायकारक असून यामुळे जिल्हा परीषदेच्या अनेक शाळा बंद पडत आहेत. तरी शासनाने अशा जाचक अटी लादू नयेत अशा मागण्या समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात आल्या आहेत. जर या मागण्या मान्य झाल्या नाहीत. तर समाजवादी पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजीराव कांबळे, शेख जिलानी महेबुब, शेख जिलानी यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# राजकीय कुस्तीच्या आखाड्यात पंकजाताई महाराष्ट्र केसरी तर देवाभाऊ हिंद केसरी आहेत-शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्राच्या राजकीय कुस्ती आखाड्यात ना.पंकजाताई मुंडे या महाराष्ट्र केसरी आहेत तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंद केसरी आहेत ते केव्हा कोणता डाव टाकतील हे विरोधकांना कळत नाही असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले आहेत



दत्त जयंती निमित्त शिरुर घाट येथे कुस्त्यांचा भाजपच्या वतीने मोठा आखाडा प्रतिवर्षी येथील कार्यकर्त्यांनी व पदाधिकारी यांनी आयोजित करतात या प्रसंगी बोलताना श्री देशमुख म्हणाले की तरुणांनी आज व्यायाम करणे शरीर सुदृढ ठेवणे गरजेचे आहे लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांनी खेळाडूंना वेळोवेळी मदत केली आहे महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांना मुंडे साहेबांनी दत्तक घेतले होते आज महाराष्ट्राच्या राजकारणाच्या आखाड्यात ना.पंकजाताई मुंडे महाराष्ट्र केसरी आहेत तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे हिंद केसरी आहेत यांनी विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणत्या वेळी कोणता डाव टाकतील हे विरोधकांना देखील कळत नाही या ठिकाणी भाजपचे वतीने कुस्तीची दंगल भरवली जाते हे खुप अभिमानास्पद बाब असल्याचे सांगुन या गावाला ना.पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातुन तालीम मिळवून देऊ असे आश्वासन श्री देशमुख यांनी दिले याप्रसंगी जि.प .समाजकल्याण सभापती संतोष हंगे केज मंडळ अध्यक्ष भगवान केदार बीड मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ उपस्थित होते.मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विविध ठिकाणचे पैलवान कुस्ती दंगल साठी उपस्थित होते.या ठिकाणी सुंदर हजारे मच्छीद्र सांगळे अशोक गायकवाड विजय सांगळे बळीराम डोईफोडे विक्रम कुरुंद अजय जाधव महादेव तांबडे रामभाऊ कुरुंद मगरध्वज कुरुंद आश्रुबा घोडके विद्याधर जवळकर शिवाजी सांबरे रामभाऊ जाधव आदी कार्यकर्ते पदाधिकारी

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## आष्टा शिवारातून ५० हजारांचा साहित्य चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

आष्टा (ता. भूम) शिवारातील शेतातील विहिरीजवळ ठेवलेले ५० हजार रुपये किंमतीचे साहित्य अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राहुल महादेव लोखंडे (वय ३७, रा. आष्टा, ता. भूम) यांच्या गट क्रमांक २६४ मधील शेतातील विद्युत मोटारीसाठी आणलेले आर्मेचर व ट्रॅक्टर स्टॅण्ड असे एकूण ५०,००० रुपयांचे साहित्य २ डिसेंबर रोजी



सकाळी ६.०० वाजेपासून ३ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेले.

या बाबत राहुल लोखंडे यांनी ५ डिसेंबर रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून भा.दं.वि. कलम ३७९ (चोरी) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### जागतीक एड्स दिनानिमीत्ताने मुरूममध्ये जनजागृती

**मुरूम, दि.७ डिसेंबर -**

जागतिक एड्स दिनानिमित्त मुरूम शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने ज्युनिअर कॉलेज येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. अडथळ्यावर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/ एड्स ला लढा देऊ, नव परिवर्तन घडवू या घोषवाक्याने शपथ देण्यात आली. तसेच युवक, युवतींना एचआयव्ही एड्सबद्दल सविस्तरपणे मार्गदर्शन करताना डॉ. महेश बिरादार व समुउपदेशक विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी गजानन उपासे, प्रसाद इंगोले प्रा. किसन माने तसेच रुग्णालयाचे रवी लोहार, संदीप बाबाळसुरे व महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### लोहारा शहरात दत्तजयंती साजरी

**लोहारा, दि.७ डिसेंबर -**

लोहारा शहरातील महात्मा फुले चौकातील पवित्र उंबराचे वृक्ष असून दत्तजयंतीनिमित्त त्याची मनोभावे भक्तिभावाने विधिवत पूजा करण्यात आली. या धार्मिक उत्साहा सोबतच निसर्ग संवर्धनाचा संदेश देत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक विजयकुमार ढगे व मित्र परिवाराच्या वतीने औदुंबर वृक्षाची पूजा करून महाआरती तसेच महाप्रसादाचे वाटप करण्यात आले असुन भाविक भक्तांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी विजयकुमार ढगे, के.डी. पाटील, बसवराज पाटील, माणिक चिकटे, हरी लोखंडे, दगडू तिगाडे, प्रशांत थोरात, वैभव होंडराव, धनराज फरीदाबादकर, प्रमोद पोतदार, पिंटू लोखंडे, अनिरुद्ध जोशी आदींसह भाविक कार्यक्रमात सहभागी झाले होते.



### आर्य चाणक्य विद्यालयात महापरिनिर्वाण दिनी डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका देशमाने एस.जी. उपस्थित होत्या. कार्यक्रमात सहशिक्षक जाधवर पी.जे. यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या जीवन कार्याबद्दल, संविधान निर्मितीतील भूमिकेबद्दल तसेच विद्यार्थ्यांसाठी त्यांनी दिलेल्या प्रेरणादायी विचारांची माहिती दिली.

### सोन्या-चांदीचा ऐवज लंपास

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

तालुक्यातील जकेकुर येथे घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने घराची कडी तोडून ५५,५०० रुपयांचा सोन्या-चांदीचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी जयश्री पंडीत बिराजदार (वय ६५) यांच्या राहत्या घराची कडी अज्ञात व्यक्तीने ३ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजेपासून ५ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजेदरम्यान कापून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील १९ ग्रॅम सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकूण ५५,५०० किंमतीचा ऐवज चोरून नेला. जयश्री बिराजदार यांनी ५ डिसेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## राष्ट्रीय महामार्गालगत घाणीचे साम्राज्य; रस्त्याला आले उकीरड्याचे स्वरुप

### शहरवासीयांची कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

नळदुर्ग ते रोकडया हनुमान मंदिरापर्यंतच्या सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड प्रमाणात साचलेली घाण, टाकाऊ मांस व मृत कोंबड्यांची पंखे यामुळे या मार्गाला अक्षरशः उकीरड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले असून महामार्गालगत कचरा टाकणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून जोर धरत आहे.

नळदुर्ग बसस्थानकापासून पुढे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात घाण साचली असून गटारीचे पाणी थेट रस्त्यावर येत आहे. त्यातच मृत कोंबड्यांची पंखे व टाकाऊ मांस टाकल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. या घाणीमुळे महामार्गालगत डुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून या प्राण्यांमुळे वाहनचालकांसमोर मोठा अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. घाणीच्या डबक्यांमध्ये डुकरे फिरत असल्याने गाळ व कचरा थेट रस्त्यावर येतो. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांची गैरसोय तर होतेच, शिवाय गंभीर आरोग्यधोका निर्माण होऊ शकतो.



नवीन नळदुर्ग बायपास सुरू झाल्यापासून जुन्या महामार्गावरून वाहने अत्यल्प प्रमाणात जात आहेत. जड वाहने क्वचित, तर बसवाहतूक मात्र अद्याप नळदुर्ग मार्गेच सुरू आहे. तरीदेखील राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मार्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. नळदुर्ग ते अलीयाबाद पुलापर्यंत रस्त्यावर मोठमोठे, जीवघेणे खड्डे पडले असून वाहनचालकांना धोका वाढला आहे. फुलवाडी टोलनाक्यावरून या मार्गाने जाणाऱ्या वाहनांकडून टोल वसूल केला जातो. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करणे ही राष्ट्रीय महामार्ग विभागाची जबाबदारी असल्याची नागरिकांची भूमिका आहे.

### प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे...

या मार्गावरील कचरा टाकणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करून भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, यासाठी दक्षता घेण्याची नागरिकांची मागणी आहे. तसेच नळदुर्गमार्गे गेलेल्या राष्ट्रीय महामार्गाची तात्काळ सफाई व दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे शहरवासीयांनी स्पष्ट केले आहे.

नळदुर्ग हे ऐतिहासिक शहर असून येथील प्राचीन किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. मात्र शहराच्या प्रवेशद्वारावरच असे घाणीचे साम्राज्य असल्याने नळदुर्गची प्रतिमा खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मृत कोंबड्यांची पंखे व टाकाऊ मांस टाकल्या जाणाऱ्या जागेजवळच रोकडया मारुतीचे मंदिर आहे. यामुळे भविष्यात मंदिराचे पावित्र्य बाधित होऊ शकते, अशी नागरिकांची चिंता आहे.

वाऱ्यामुळे मृत पंखे परिसरात उडून जात असल्याने चिकन विक्रेते व पोल्ट्रीधारकांना पंखांची योग्य विल्हेवाट लावण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी होत आहे.

## लिफ्टच्या बहाण्याने सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

बार्शी-लातूर रोडवरील गणेश हॉटेलसमोर लिफ्ट देण्याच्या बहाण्याने एका वृद्ध महिलेला फसवून ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, केशरबाई जनार्धन नागटिळक (वय ७०, रा. जुने रेल्वे स्टेशन, रामलिंग येडशी) या १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे ३.३० वाजता बार्शी-लातूर रोडवर पायी जात होत्या. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने चारचाकी वाहनात लिफ्ट देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडील २० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत ८०,०००) चोरून नेले.

फिर्यादी केशरबाई नागटिळक यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ४२० (फसवणूक), ३७९ (चोरी) व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## शिक्षकांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

शिक्षकांना टीईटी मधून सूट मिळावी, संच मान्यतेवरील जाचक अध्यादेश रद्द करावा, तसेच जुनी पेन्शन योजना लागू करावी यांसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्ह्यातील खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांसोबत जिल्हा परिषद व नगरपरिषद शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुक्रवार (ता.५) रोजी काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदवला.

धाराशिव जिल्हा शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीच्या वतीने आयोजित या आंदोलनाला जिल्हाभरातील शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. १३ फेब्रुवारी २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांसाठी टीईटीची अट रद्द करण्यासाठी राज्य सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी, १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेवरील जाचक शासन निर्णय रद्द करावा, सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शिक्षकांना अशैक्षणिक व ऑनलाईन कामातून पूर्णतः मुक्तता देऊन फक्त अध्यापनाचे काम देण्यात यावे, शिक्षण सेवक योजना बंद करावी, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी, पटसंख्येच्या कारणावरून शाळा बंद न करण्याची हमी द्यावी.

या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे पाठविण्यात आले आहे. या निवेदनावर बाळकृष्ण तांबारे, विलास कंटेकुरे, कल्याण बेताळे, उमाकांत कुलकर्णी, बालाजी तांबे, जयपाल शेरखाने, संतोष देशपांडे, रमेश बारसकर, प्रशांत माने, सुखदेव भालेकर, वैजिनाथ सावंत आदींसह अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

### आचारसंहितेमुळे मोर्चा स्थगित : उमाकात कुलकर्णी



राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद उमाकांत कुलकर्णी यांनी सांगितले. आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणारा शिक्षकांचा आक्रोश मोर्चा स्थगित केला आहे. परंतु आचारसंहिता संपताच डिसेंबर अखेर धाराशिव जिल्ह्याचा न भूतो न भविष्यती असा भव्य मोर्चा काढू. वेतनकपातीची पत्रे काढून शिक्षकांवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला, मात्र शिक्षकांच्या न्यायहक्कांसाठी तो दबाव झुगारून ऐतिहासिक आक्रोश मोर्चा काढला जाईल.

## समता-बंधुता-न्याय हीच खरी दिशा : पोनि. सचिन यादव

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समतामूलक समाज उभारण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे ही काळाची गरज आहे. ६ डिसेंबर हा केवळ शोक व्यक्त करण्याचा दिवस नसून आत्मचिंतन, आत्मपरीक्षण आणि समाजपरिवर्तनाचा संकल्प करण्याचा दिवस आहे, असे प्रतिपादन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नळदुर्ग येथे आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजी गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक पत्रकार तथा बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले.

या कार्यक्रमाला पोलिस उपनिरीक्षक इश्वर नांगरे, धनराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बापू बनसोडे, विश्वास रणे, अजयकुमार बागडे, योगेश सुरवसे, अमर बनसोडे, बापू दुरुगकर, सुभाष कांबळे, पप्पू कांबळे, सिद्धांत बनसोडे, अनिता रणे, यशोदा बनसोडे, राजेंद्र कांबळे, पांडू शिंदे, ऋषिकेश कांबळे, अतुल बनसोडे, खंडू गायकवाड, आशिष कांबळे, योगेश बनसोडे, संदेश दुरुगकर, नामदेव बनसोडे, प्रकाश बनसोडे, सुजाता लोंढे, सुनंदा सुरवस, उषा दुरुगकर, माजी सैनिक पद्माकर पुजारी, राजरत्न बनसोडे, हमराज कांबळे, वैभव कांबळे, छाया कांबळे यांच्यासह भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मलकापूर जि.प. शाळेत 'एक पेन, एक वही' उपक्रमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.७ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. यानिमित्त 'एक पेन, एक वही' हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना लेखनसामग्रीचे वाटप करण्यात आले.

शनिवारी (दि.६) शाळेच्या प्रांगणात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच रुक्मिणी घोळवे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना सुंदर लोमटे यांनी केली. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य, संघर्ष, विद्यार्थ्यांसाठीचे आदर्श आणि भारतीय संविधानाविषयी सविस्तर माहिती दिली.

यानंतर आंबेडकरी विचारसरणीचे युवक सुधीर पायाळे यांच्या पुढाकारातून 'एक पेन, एक वही' अभियान राबविण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पेन व वह्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बळीराम भंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका नंदिनी गाडे यांनी मानले.

कार्यक्रमास दत्तात्रय लोमटे, आदित्य लोमटे, सुधीर लोमटे, सतीश ओव्हाळ, अजय लेकरवाळे, अभिजीत लोमटे, स्वप्नील घोळवे यांच्यासह अनेक ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंदमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ डिसेंबर -**

अनंत अडचणींचा सामना करूनही जो यशस्वी होतो, तोच खऱ्या अर्थाने इतिहास घडवतो. आजच्या बालकांमध्ये ही अचाट शक्ती आहे, फक्त तिचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे याचे ज्वलंत उदाहरण असून त्यांच्या प्रेरणेने असंख्य जणांनी यशाची शिखरे गाठली आहेत, असे प्रतिपादन सहशिक्षिका भागीरथी शिंदे यांनी केले.



श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर, उमरगा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या.

पुढे बोलताना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या मुलांची अध्ययनाची बैठक व्यवस्था सुधारण्याची गरज आहे.

एकाग्रचित्ताने दररोज फक्त दोन तास अभ्यास केला तरी निश्चित यश मिळू शकते; मात्र त्याची सातत्याने अंमलबजावणी करणे हेच खरे यशाचे गुपित आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समीर देशपांडे (प्रमुख, सांस्कृतिक विभाग) यांनी केले.

## जयप्रकाश विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना क्रांतीसूर्य का म्हटले जाते, याची जाणीव त्यांच्या महान कार्यातून होते. त्यांच्या विचारांचे पालन केल्यास जीवन अधिक सुंदर व अर्थपूर्ण बनते, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास अण्णा कोळगे यांनी जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून केले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक करताना प्राचार्य जयप्रकाश कोळगे म्हणाले की, भारतीय संविधान रचण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निभावलेली भूमिका अत्यंत मोलाची आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा मूलमंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेऊन देशोन्नतीसाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा

### उमरगा येथील २ रे सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचे न्यायालयात

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२७/२०२५** **निशाणी क्र. ०७**
**झुंबर / निरंक**

ज्यापेक्षा मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** हया **रा. चिंचोली (भु) ता. उमरगा जि. धाराशिव दिनांक ११/११/२०२३** रोजी किंवा त्यासुमारास मौजे. रा. चिंचोली (भु) ता. उमरगा जि. धाराशिव, येथे मयत झाले असून अर्जदार **क्र. १. तात्याराव व्यंटराव सुरवसे (मुलगा), २. झुंबर व्यंकट सुरवसे (मुलगा), ३. पार्वती श्रीमंत माने (मुलगी), ४. हारुबाई अंबादास सुरवसे (मुलगी)** यांनी ह्या कोर्टात सदरहू नयत कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे यांच्या नावचे वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे यांचे मृत्यू पश्चात कार्यालयीन कामाकाजाकरिता अर्जदारांचे नावे वास्सा हक्काने नावे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत **कै. चंपाबाई व्यंकट सुरवसे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**दिनांक ११/०८/२०२५ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख १६/०१/२०२५**

| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
|---|---|
| (सी.एम. रणदिवे) | (अ.ज. सय्यद) |
| वरिष्ठ लिपीक | सहा.अधिक्षक |

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उमरगा**

## जाहीर सुचना

याद्वारे नागरिकांना सुचना देण्यात येते की, **श्रीमती आशा सुनिल भोसले** हया खालील परिशिष्टात वर्णन केलेलया मिळकतीच्या (जिचा उल्लेख सदर मिळकत केलेला आहे) मालक असुन सदर मिळकत त्यांच्या ताब्यात व कब्जेवहिवाटीत आहे सदर मिळकत ही **श्रीमती आशा भोसले** यांनी माझे अशिलांना कायम फरोक्त खरेदीखताने विकण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. माझे आशिल यांनी मला सदरहू मिळकतीचे श्रीमती आशा सुनिल भोसले यांचे असलेले नामनिर्देश हे तपासण्यास सांगितले आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकत अगर त्यांचे पैकी कोणत्याही भागाबाबत विकी, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांतरणपत्र, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा, सुविधाधिकार, वारसाहक्क, विकसनाचे हक्क, सामंजस्य करार वा इतर कुठलाही करार याद्वारे किंवा सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा काही हक्क हितसंबध, हिस्सा वा अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी तो लेखी स्वरुपात कागदपत्रांसकट, पुराव्यासकट निम्नस्वाक्षरीकाराकडे पत्ता ३, गिरीराज सोसायटी, गोखले रोड, नौपाडा, स्टेट बँक ऑफ इंडिया जवळ, ठाणे पश्चिम, तालुका व जिल्हा ठाणे ४००६०२ येथे सदर जाहिर नोटीस आजच्या तारखेपासुन १४ दिवसांत सादर करावा. अन्यथा सदर मिळकतीवर अन्य कोणत्याही प्रकारे हक्क, क्लेम, अधिकार वा बोजा नाही व असल्यास त्यांनी तो जाणुनबुजुन सोडुन दिल्याचे किंवा मागे घेतल्याचे समजण्यात येईल.

### परिशिष्ट

जिल्हा रजि. नोंदणी तुकडी धाराशिव पोट तुकडी व ता. तुळजापुर पैकी मोजे तामलवाडी येथील जिल्हा परिषद धाराशिव ता. पंचायत समिती तुळजापुर पैकी मोजे तामलवाडी येथील स्थावर मिळकत खालीलप्रमाणे -

| गट क्रमांक | एकूण क्षेत्र (हेक्टर. आर.) | मालकीचे क्षेत्र |
|---|---|---|
| ११४ | ४ हे. ४५ आर. | ४ हे. ४५ आर. |
| २१० | ५ हे. १० आर. | ०. हे. ५८ आर. |
| २११ | ७ हे. ९९ आर. | ०. हे. ३८ आर. |

**दिनांक**

**स्वाक्षरित /-**
**श्री. ए.ए. नाडकर्णी,**
**ॲडव्होकेट**
**मो.क्र. ९८९२००७०११**
Email-amitabhnadkarnigmail.com

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

दिनेश गुणे

# भूमिका, भ्रम आणि संभ्रम...

केवळ राजकारणातच नव्हे आणि केवळ राज्य किंवा देशातच नव्हे, तर जगभरातील कुठल्या ना कुठल्या कोपऱ्यात सध्या जे काही सुरू आहे, ते पाहिले की एक गोष्ट नक्की पटते, ती म्हणजे, काळ मोठा कठीण आला आहे. इंग्लंड-अमेरिकेतील एखादी राजकीय उलथापालथ असो, एखाद्या देशात सुरू झालेली आणि शमलेली जेन-झी नावाच्या नव्या पिढीची नवआंदोलने असोत, एखाद्या देशात कोणा माथेफिरूने एखाद्या शाळेत, मॉलमध्ये किंवा भर रस्त्यात बेछूट गोळीबार करून निष्पापांचे क्रूर बळी घेणे असो, शेजारच्या श्रीलंकेतील किंवा बांगलादेशातील भयावह राजकीय समस्या असोत, रशिया-युक्रेन महायुद्ध असो किंवा महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाला आणि राजकारणाला दररोज मिळणारे नवे कंगोरे असोत. 'आपण बरे की आपले कुटुंब बरे' किंवा, 'माझे कुटुंब एवढीच माझी जबाबदारी' असे समजून सामान्य ज्ञानात भर घालण्यापुरतेच या प्रश्नांकडे पाहायचे ठरविले, तरी या सर्वांचा एकएकटा किंवा एकत्रित फटका थेट प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचतच असतो. महागाई, बेरोजगारी, अशा प्रश्नांचे वेढे आणखीनच घट्ट आवळायला लागतात. चहुबाजूंना समस्या, प्रश्न आणि प्रश्नांचाच महापूर आहे आणि सारे जण संभ्रमात सापडले आहेत. अशा समस्याग्रस्त वातावरणात एखाद्या प्रश्नावर बोलावे की न बोलावे असेही काहीसे शंकेचे काहूर सर्वांच्या मनात सुरू आहे. बोलावे तर काय बोलावे, बोलायचे तर कोणाच्या बाजूने किंवा कोणाच्या विरोधात बोलावे, न बोलावे तर कोणत्या प्रश्नावर न बोलावे किंवा मौनच बाळगावे हे समजणेही कठीण झाल्यामुळे, कोणत्या प्रश्नावर बोलावे, काय बोलावे अथवा कोणत्या प्रश्नावर काहीच न बोलता गप्प राहावे हे समजून घेण्यासाठीदेखील 'जाणकारां'कडेच अपेक्षेने पाहावे लागते. असे जाणकार मोजकेच असतात. कोणत्या प्रश्नावर कोणी कोणती भूमिका घ्यावी, याविषयी ते वारंवार मार्गदर्शन करत असतात. अर्थात, त्यांच्या मार्गदर्शनास मोठे महत्त्वही असते. तुमच्या आमच्यासारख्या सामान्यांच्या बाबतीत, कोणत्याही प्रश्नावर आपण आपल्याच मनाचा आवाज ऐकून अगदी प्रामाणिक भावनेने घेतलेली कोणतीही भूमिकादेखील बरोबरच असेल असे नाही असे वाटते आणि त्या भूमिकेवरील इतरांची पहिली प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आपण ती फार तर कुटुंबासमोर व्यक्त करतो. त्यावर इतरांकडून जेव्हा नापसंतीच्या भावना व्यक्त होतात, कधीकधी थेट खिल्ली उडविली जाते किंवा नाके मुरडली जातात, तेव्हा आपल्याच त्या भूमिकेस मुरडही घालून गप्पदेखील बसतो. या प्रक्रियेत, भूमिका घेणे, त्यावर व्यक्त होणे आणि इतरांस ती पटत नाही असे स्पष्ट झाल्यास गप्प बसणे या सर्व कृती म्हणजे त्या त्या प्रसंगानुसार घेतल्या जाणाऱ्या भूमिकाच असतात. आपली एखादी भूमिका कुटुंबातील सर्वांस पसंत पडली, तर मिळणाऱ्या नैतिक पाठिंब्याच्या जोरावर ती आपण कार्यालयातील सहकाऱ्यांसमोर, लोकल ट्रेनमधील सहप्रवाशांसमोर मांडतो आणि प्रवास संपेपर्यंत त्यावर घमासान चर्चादेखील घडवितो. त्यामुळे वाढणाऱ्या उत्साहाचा परिपाक म्हणजे, पुढे तीच भूमिका ट्विटर, इन्स्टा, फेसबुकसारख्या समाजमाध्यमावरही मांडतो. त्यावरील प्रतिक्रिया अजमावत राहतो. कधी उलटसुलट प्रतिक्रियांचा पाऊस पडतो, कधी चवताळलेले विरोधक आक्रमकपणे ट्रोलदेखील करतात, तर कधी कुणीच काहीच प्रतिक्रिया देत नाही. पण टीका करणे, आरोप करणे, नाराजी व्यक्त करणे किंवा कोणतीही प्रतिक्रिया देणे आणि कोणतीच प्रतिक्रिया न देता केवळ गप्प राहणे हीदेखील ज्याची त्याची भूमिकाच असते. म्हणूनच, आजकाल भूमिका हा केवळ वैयक्तिक मुद्दा न राहता, सामाजिक विषय झाला आहे. राजकारणातच नव्हे, समाजकारणात आणि कुटुंबकारणातही भूमिका घेणाऱ्याची किंवा न घेणाऱ्याची भूमिका व तसे करण्यामागची त्याची भूमिका हा अनेकांच्या औत्सुक्याचा मुद्दा ठरू पाहातो, तो त्यामुळेच!

म्हणूनच, भूमिका हा स्वतःच एक मोठा गमतीदार शब्द आहे. या शब्दाची आणि भूमिकेची असंख्य रूपे असतात. काही वेळा तर, गप्प बसणे हीदेखील एक भूमिकाच असते, हे बऱ्याचदा लक्षात येत नाही. भूमिकेचे दुसरे रूप म्हणजे, जाणकाराच्या भूमिकेत जाऊन, इतरांना भूमिका घेण्याचा सल्ला देणे हे होय! असे केल्याने, एखाद्या विषयावरील स्वतःची भूमिका मांडली नाही, तरीही जाणकार म्हणून अल्पावधीत मान्यता मिळू शकते. असे जाणकार असा सल्ला कोणत्याही क्षेत्रातील कोणाही व्यक्तीस, समूहास अथवा थेट सरकारासही देऊ शकतात. 'एखाद्या प्रश्नावर गप्प राहू नका, भूमिका घ्या', असा सल्ला जगातील कोणत्याही सरकारला किंवा नेत्याला देण्यामागेही 'सल्लागाराची भूमिका'च असते. एखाद्या प्रश्नावर सल्लागाराने बजावलेली अशी भूमिकाही मोलाची ठरत असते. समाज माध्यमांवरील एखाद्या वादात उड्या घेऊन अनेक जण हिरीरिने आपापल्या भूमिका मांडताना अलिकडे दिसतात. या भूमिकांतून त्या त्या व्यक्तीच्या विचारांची ओळख होते आणि त्याच्यावर एक विशिष्ट शिक्काही बसतो. हा शिक्का त्याच्या राजकीय विचारसरणीची खिल्ली उडविणारा असतो, कधी अशाच भूमिकांमुळे समविचारी समाज-माध्यमकर्मींचे कोंडाळे तयार होऊन एक आभासी मंचावरील आभासी संघटितपणाचेही दर्शन घडते आणि अशा झुंडी विरोधी विचारांच्या कोणत्याही अशाच संघटितांवरही आक्रमकपणे हल्ले करू लागताना दिसतात. मग ते हल्ले परतवून लावण्यासाठी समोरची समविचारींची झुंड आक्रमकपणे दंड थोपटून शब्दयुद्धास तयार होते आणि समाज माध्यमांचे मंच म्हणजे विचारांची रणभूमी होते.

साहित्यिक हा समाजमनाचा आरसा असतो. तसे चित्रकार, पत्रकार, व्यंगचित्रकार असे अनेक जण समाजमनाचेच आरसे असतात. त्यामुळे या सर्वांनीच सध्याच्या काळात कोणती ना कोणती भूमिका घेणे गरजेचेच आहे. विशेषतः, कोणत्याही विषयावरील माध्यमांच्या भूमिकेकडे समाजाचे लक्ष लागलेले असते. कारण त्यातूनच, समाजातील



अन्य घटकांची भूमिका तयार होत असते. हे लक्षात घेता, या सर्वांनी काहीतरी भूमिका घेतली पाहिजे हे योग्यच असते. पण बऱ्याचदा, यातील अनेक जण गप्प बसण्याचीच भूमिका घेतात, तेव्हा या लोकांना भूमिका घ्या असे बजावण्याची भूमिका अशा जाणकारांनाच वठवावी लागते. कोणती भूमिका घ्यावी हा मात्र, प्रत्येकाचा आपापला विषय असतो. कोणताही समंजस माणूस समाजाने, नेत्याने किंवा देशाने कोणत्याही प्रश्नावर, म्हणजे, आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा नैमित्तिक यापैकी कशावरही, कोणती भूमिका घ्यावी असा सल्ला कधीच कुणाच्या माथी मारत नसतो. आपली भूमिका न मांडता, 'भूमिका घ्या' असा सल्ला देण्याची भूमिका बजावणाऱ्या अशा जाणकारांकडे नेहमी सोबत एक 'गुलदस्ता' असतो. आपली भूमिका या गुलदस्त्यात (ताजी) राहील याची काळजी घेणे हीदेखील एक 'प्रासंगिक भूमिका'च असते... असा प्रकार विशेषतः राजकारणात दिसतो. कारण, राजकारणातील कोणावरही कोणत्याही प्रश्नावरील एखाद्या भूमिकेत सातत्य राखण्याचे बंधनकारक नसते. उलट, त्या त्या वेळी, त्या त्या परिस्थितीनुरूप विचार करून प्रासंगिक भूमिका घेणारेच यशस्वी ठरतात, असेही दिसून येते. कारण, जनतेची, म्हणजे समाजाची स्मरणशक्ती अल्पजीवी असते यावर राजकारणाचा नितांत विश्वास असतो. जनतादेखील कधीकधी त्या विश्वासास बळ देणारी भूमिका घेत असते. तीदेखील बहुतांश वेळा प्रासंगिकही असते. राजकारणातही आभासी मंचावरील झुंडींप्रमाणे, प्रत्यक्ष समविचारी म्हणविणाऱ्यांच्या झुंडीदेखील असतात. त्या झुंडी ज्या कोणाकडे आपला नेता म्हणून पाहात असतात, त्याची भूमिका ही त्या झुंडींची भूमिका असते. त्यामुळे, एखाद्या राजकीय पक्षाचा निष्ठावंत किंवा अनुयायी किंवा मतदार म्हणविणाऱ्यास त्याची स्वतःची भूमिका ठरविण्याचे मानसिक दडपण सहसा येत नाही. आपण ज्या नेत्याच्या भूमिकेस पाठिंबा देतो, त्या नेत्याची प्रासंगिक भूमिका ही त्या त्या वेळी त्या अनुयायांची भूमिका असते. असे झाल्याने, आपल्या नेत्याची अगोदरची भूमिका कोणती होती आणि आता प्रसंगानुसार त्याने घेतलेली नवी भूमिका कोणती याचा विचार करण्याचे कष्ट घेण्याची त्यास कधी गरज भासत नाही.

अशा प्रासंगिक भूमिका घेण्यात महाराष्ट्राचे राजकारण वाकबगार आहे. राज्यातील काही नेत्यांनी प्रासंगिक भूमिका घेतच राजकारणात अनेक दशकांच्या वाटचालीचे टप्पे यशस्वीपणे पार केले आहेत. तर काही नेत्यांना आपली स्वतःची कोणतीच भूमिका न घेता, समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार कोणत्याही वेळी कोणतीही भूमिका घेण्यातच आनंद वाटतो. विशेष म्हणजे, ठाम भूमिका, स्पष्ट विचार आणि योग्य राजनीती या त्रिसूत्रीनुसार एका विचाराशी बांधिलकी मानून त्या विचाराशी सुसंगत अशी भूमिका घेणाऱ्यापेक्षाही, प्रासंगिक भूमिका घेत वाऱ्याच्या दिशेचा अंदाज घेत पाठ फिरविणाऱ्यांच्या भूमिकेचे अधिक कौतुक होते. गेल्या दशकभराच्या राजकारणाकडे पाहिल्यास, अशा प्रासंगिक भूमिका घेणाऱ्यांच्या राजकारणाचे सोने झाले असे म्हणता येते. आता नव्या राजकीय परिस्थितीनुसार नव्या भूमिका घेण्याचा आपला अधिकार अबाधित ठेवून नवी भूमिका घेण्याचीही त्यांची तयारी असते. म्हणूनच, राजकारणातील अशा भूमिकांकडे सर्वांचे लक्ष लागलेले दिसते. कोणतीही भूमिका न घेता गोंधळलेल्या मानसिकतेतून काहीतरी करत राहणे हीदेखील एखाद्याची भूमिकाच वाटावी एवढ्या बेमालूमपणे मानसिक गोंधळही साजरा करण्याची भूमिका घेणाऱ्यांचेदेखील वारेमाप कौतुकही होताना दिसते.

मुळात, कोणत्याही प्रश्नावर काही ठाम भूमिका घेण्यासाठी, त्या संबंधित प्रश्नाची सखोल जाण असणे गरजेचे असते, यावर प्रासंगिक भूमिका घेणाऱ्या कोणाचाही विश्वास नसतो. त्यामुळे, त्या त्या प्रसंगात आपण नेमके कोणत्या स्थानी आहोत, याचा विचार करून त्या स्थानाशी सुसंगत अशी भूमिका घेऊन प्रसंग साजरा करण्यावर त्यांचा भर असतो. आपल्याला साखरेच्या राजकारणातले काही कळत नाही, कारण साखरेचा आणि आमचा संबंध केवळ चहात वापरण्यापुरताच असतो असे सांगत महाराष्ट्राच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काहीच कळत नसल्याची प्रांजळ कबुली देऊन उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असतानाही शेतकऱ्यांची मने जिंकली होती. अर्थसंकल्पातले काही कळत नाही, सत्तेवर असताना अर्थसंकल्पाचे कौतुक करायचे आणि विरोधात असताना टीका करायची एवढेच आपल्याला माहीत आहे, असे सांगून त्यांनी प्रासंगिक भूमिका म्हणजे काय तेही दाखवून दिले होते.

विशेषतः, २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदाच्या वादातून त्यांनी भाजपसोबतची युती तोडून महाविकास आघाडीत प्रवेश केल्यानंतर पक्षाच्या वैचारिक भूमिकेतून केलेले संपूर्ण घूमजाव हा तर राजकीय कोलांटउडीचे ढळढळीत उदाहरणच ठरले. हिंदुत्वाच्या मुद्यावर राजकारण करणे ही आपल्या पक्षाची चूक होती, अशी कबुली देत महाविकास आघाडीवर प्रभाव असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या भूमिकेशी जुळवून घेत उद्धव ठाकरे यांनी भूमिका बदलाचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्यानंतरही, २०२२ मधील शिवसेनेतील मोठ्या फुटीनंतर नव्या परिस्थितीनुरूप नव्या भूमिका घेण्याची वेळ त्यांच्या राजकारणावर ओढवली आणि काही भूमिकांमुळे त्यांच्या राजकारणास माघार घेणेही भाग पडले. विधानसभेच्या निवडणुकीआधी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवा आणि जाहीर करा असे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ठामपणे बजावणाऱ्या ठाकरे यांच्या भूमिकेस काँग्रेस आणि शरद पवार यांनी कोणताच प्रतिसाद दिला नाही हे पाहून त्यांना त्या वेळी ती भूमिका गुंडाळणे भाग पडले होते. याच महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी आपल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीवर तिखट टीका केली तरीही आघाडीला तडा जाऊ नये अशी भूमिका घेत ठाकरे यांनी त्यावर मौन पाळण्याची भूमिका घेतली.

मौनाची भूमिका अनेकदा शाब्दिक भूमिकेहूनही प्रभावीपणे बोलकी ठरते, असे राजकारणात दिसते. एखाद्या प्रश्नावर कोणतीही एखादी स्पष्ट भूमिका घेतल्याने, धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी स्थिती ओढवण्याची शक्यता दिसत असेल, तर अनेकदा मौनाची भूमिका घेणे पसंत केले जाते. या मौनाच्या भूमिकेचे अनेक प्रकार असतात. सूचक मौन हा त्यापैकी सर्वांत सोपा आणि सर्वांच्या लक्षात येणारा प्रकार असतो. एखाद्या प्रश्नावर काहीच न बोलता मौन पाळले तर माध्यमांकडून त्यास सहसा सूचक मौन असे म्हटले जाते. या मौनाच्या भूमिकेमुळे अडचणीच्या प्रसंगातून सहीसलामत मोकळे होणे सोपे होते. काही वेळा मौनाच्या भूमिकेला हास्याची जोड दिली जाते. एखाद्या प्रश्नावर काहीच न बोलता केलेल्या केवळ सूचक हास्यातूनही भूमिका स्पष्ट होते आणि तरीही त्यापासून वेळप्रसंगी नामानिराळे होण्याचा मार्गही मोकळा ठेवता येतो. शरद पवार यांच्या भूमिका हा एक गमतीदार मुद्दा महाराष्ट्रात गेल्या पाच-सहा दशकांपासून चर्चिला जात असतो. त्यांच्या बदलत्या भूमिका हाच त्यांच्या राजकारणाचा गाभा आहे, असेही म्हटले जाते. कधी त्यांची भूमिका संभ्रमात टाकणारी वाटते, तर कधी त्यांच्या भूमिकेतून संघर्षाच्या तयारीची चाहूल लागते. कधी ते एखाद्याच्या विरोधाची भूमिका घेतात, तर कधी ज्याच्या विरोधाची भूमिका घेतली त्याच्यावरच स्तुतिसुमने उधळून लोकांना संभ्रमातही टाकतात. कधी एखादी भूमिका ठामपणे मांडल्यानंतरही, नंतर त्याचा ठाम इन्कार करून मी असे बोललोच नव्हतो, असे सांगत त्याचे खापर माध्यमांच्या माथीही मारण्याची कला काही नेत्यांना अवगत असते. त्यामुळे नेत्यांच्या भूमिका हा वेळोवेळी अभ्यासावा असा विषय आहे. पण तो सोपा नाही. तसा अभ्यास करावयाचा असेल, तर आपल्या भूमिका बाजूला ठेवून त्यांच्या भूमिकांकडे लक्ष द्यावे लागते. आता महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा हंगाम सुरू आहे. पुन्हा युती, आघाडीच्या राजकारणाचे वेगळे संकेत मिळत आहेत. नेत्यांच्या स्थायी भूमिका आणि प्रासंगिक भूमिका पडताळण्यासाठी हा सर्वांत चांगला हंगाम असल्याने, भूमिकांचा अभ्यास करणाऱ्यांकरिता ही एक चांगली संधीदेखील आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### भविष्यात पैशाचे महत्त्व शून्य आणि काम ऐच्छिक ठरेल

आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरू झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाऊथ कॉन्फरन्समध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेन्स' ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये ॲलन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला. रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे.

पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोक इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक कार्ड्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास पैसा हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. भविष्यात ऊर्जा हीच खरी करन्सी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. एलन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या कल्चर सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पॉवर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणाऱ्या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली. जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात पैसा नाहीसा होईल. नोकऱ्या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच खऱ्या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणाऱ्या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोक कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील.

टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या असे रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामे हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

●● ●●

### रील ते रिअल

माणसांच्या सभ्यतेचा काळ सांगा किंवा कोणत्या काळात माणसं सभ्य होती याचं उत्तर आपल्याला मिळू शकणार नाही. तसंच मीडियाचा स्तर कुठल्या थरापर्यंत सोशल आणि सभ्य आहे यालाही उत्तर नाही. कुठल्याही गोष्टीचे फायदे आणि तोटे असतात. त्या फायद्यांचा अतिरेक झाला की तोटे सुरू झालेच म्हणून समजा. साध्या साध्या गोष्टींची आवड किंवा छंद म्हणून सुरू केलेला चाळा जेव्हा जीवघेणा ठरतो तेव्हा आवड ही व्यसन होते आणि विवेक नष्ट होतो. सध्या फार कॉमन झालेली गोष्ट म्हणजे समाजमाध्यमांवरची रील हा प्रकार. ह्यापायी अनेकांचे जीव गेल्याच्या बातम्या आपण रोज वाचतो.

अलिकडेच उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात मणिकर्णिका घाटावर कुटुंबासोबत आलेली एक महिला नदीच्या पाण्यात उभी राहून रील बनवत होती. तिचे कुटुंबीय समोरच उभे होते. रीलच्या नादात महिलेचा पाय घसरला आणि ती सगळ्यांच्या डोळ्यादेखत वाहून गेली. तिची मुलगी आई आई करून टाहो फोडत राहिली. यात लहान मुलांनी देखील जीव गमावला आहे. सोशल मीडियावरच्या लाईक्स आणि व्ह्यूज यासाठी लोक कोणत्या थराला जाऊ शकतात आणि त्याचे काय परिणाम होतात हे आपण बघतो, वाचतो. तसेच नवीन ट्रेंड म्हणजे या रील्सच्या नादात कोणत्याही वयातील स्त्री-पुरुष आनंदासाठी सामूहिक रील्स बनवतात. स्वानंदासाठी बनवून आपल्या गटापुरता मर्यादित ठेवून त्याचा आनंद घेतला आणि एंजॉय केले तसेच एक छान आठवण म्हणून जपून ठेवणे काही गैर नाही. परंतु चित्र विचित्र कपडे घालून विकृत अंगविक्षेप करून ती रील सर्वांसाठी समाजमाध्यमांवर खुली करणे आणि त्यात काही गैर न वाटणे हे फार हास्यास्पद आहे. मग त्यावर तितक्याच चावट कॉमेंटचे स्वागत करणे हे कुठेतरी खटकते. फिल्मी लोकांसाठी जेवढे ट्रोल होऊ तेवढे नाव होईल असे गणित असते. परंतु आता सामान्य जन देखील याला फसताहेत. वयस्क महिलाही याला अपवाद नाहीत. मनोरंजनाकरता आनंद घेणे हे ठीक आहे. परंतु नाचता येईना अंगण वाकडे असे अंगविक्षेप करून त्याच रील बनवणे म्हणजे पुढच्या पिढीला काहीही करण्याचे स्वातंत्र्य आहे असे सुचविणे आहे. एकदा एका कार्यक्रमात एका व्याख्यात्यांनी कार्यक्रमाची सुरुवातच या रील्सच्या दलदलीला कोणीतरी आवरा रे अशीच केली होती. एक सेलिब्रिटी तर आपल्या आधीच्या कारकीर्दीचा, पांढऱ्या केसांचा विचार न करता अश्लील अंगविक्षेप करून रील्स वर रील्स टाकत होता आणि टीकेच्या झोडीला पात्र झाला. एवढे वर्ष कमावलेला आदर आणि कौतुकाची जागा टीकेने घेतली. स्वतःकरिता केलेल्या छंदाचे बाजारीकरण कशासाठी? संस्कृती, कला, नृत्य, साहित्य, वैश्विक ज्ञान आणि बरंच काही चांगलं शिकविणारे समाजमाध्यम म्हणजे आज कित्येकांच्या उपजीविकेचे साधन झाले आहे. परंतु काही वेळा आपली सद्सदविवेकबुद्धी गहाण ठेवून त्याचा अतिरेक केला तर अपचन होईल आणि आपण भलत्याच अडचणीत सापडू. डिजिटल अरेस्टसाठी गुन्हेगार टपूनच बसले आहेत. ते आपल्याला ब्लॅकमेल करू शकतात. नको तिथे बोलायचे, व्यक्त व्हायचे, सोशल मीडियावर आपले ज्ञान पाजळायचे आणि जिथे संयमाने वागायचे तिथे वाद घालत बसायचे, कुणी आपल्याला किती आणि का सहन करायचे? या मागे सोशल मीडियाला नावे ठेवण्याचा हेतू मुळीच नाही. परंतु त्यावर किती सोशल राहायचे हे ठरविणे आवश्यक आहे.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

●● ●●

### जबाबदारांचे बेजबाबदार वर्तन...

आमच्या काळी असं होतं. आमच्या काळी तसं होतं. छान वारं वाहत होत. थंडी खूप पडत होती. आता पहिलेसारखं काही राहिलं नाही. सगळं काही बदललं आहे. अशा प्रकारची अनेक विधानं बरेच ठिकाणी ऐकू येतात. पण काळजीपूर्वक पाहिलं तर निसर्ग अजूनही आहे तसाच आहे. ऋतुचक्राचं त्याचं भान अजूनही टिकून आहे. ठरावीक दिवसापासून पानगळ होणार म्हणजे होणार. झाड निष्पर्ण होणार. ठरावीक तारखेपासून दिवस लहान-मोठा होणार. सांगण्याचे तात्पर्य तो अजून तसाच आहे, आपण मात्र फार बदललो.

सुशिक्षित लोकांनी केलेला कचरा अशिक्षित माणसे उचलतात ही फार मोठी शोकांतिका आहे. आम्हाला कचरा फेकायचं भानच नाही. ओला कचरा, सुका कचरा या गोष्टी तर फार दूर राहिल्या. मागील काही दिवसात मी दोन लग्नकार्यात उपस्थित होतो. एका लग्नात चहा, कॉफी, पाणी पिण्यासाठी सर्रास डिस्पोजेबलचा वापर सुरू होता. दुसरीकडे छान काचेचे प्याले थंड गरम सगळं पिण्यासाठी उपलब्ध होते. साध्या अक्षता देण्यासाठी जाडजूड प्लॅस्टिक त्याला अजून एखाद आवरण काढता काढता मुश्किल. दुसरीकडे छान कापडी पिशवीत अक्षता दिल्या होत्या. सगळं काही सोईस्कर आणि सुटसुटीत. दोन टोपल्या हातावर अक्षता देणं हे तर अतिउत्तमच म्हणावं लागेल. लग्न झाल्यानंतर वधू-वरांच्या अंगावर जे उडवलं जातं ते प्लॅस्टिक पुन्हा गोळा होत नाही. इकडून तिकडे वाऱ्यासोबत छान गावभर फिरत असत. त्याने सांगितलं उडवायचं आणि आपण उडवायच. त्या ऐवजी फुलांच्या पाकळ्या किती छान पर्याय उपलब्ध आहे. निसर्गातूनच घ्यायचं निसर्गालाच द्यायचं. थोडासा विचार जर का चांगला निसर्ग अनुभवलेल्या पिढीने केला तर अजूनही आपण बरंच शहर, हवा सगळं काही स्वच्छ करू शकतो. फक्त आपली इच्छा पाहिजे. थोडासा आग्रह पाहिजे. संघाने पर्यावरण विषयाला हात घातला आहे. ते समजून आपण तसा आग्रह धरला पाहिजे. तरच पुढील पिढीसाठी हवा ही शुद्ध राहील. पाणीही स्वच्छ राहील. कॅन्सरच्या दवाखान्यातील गर्दीही आटोक्यात राहील. या सगळ्या गोष्टींचे वाईट अनुभव येण्यास सुरुवात झालेली आहे. हा बदल मी करणार आणि माझ्यापासूनच करणार. सगळे करतात पण ते चुकीचं आहे हे मला कळलं पाहिजे. एकट्याने काय होणार हा प्रश्न पडतात कामा नये. खारुताईच्या गोष्टीप्रमाणे आपल्याकडे लक्ष आहे देवाचं. सगळं काही भरभरून देणाऱ्या निसर्गाचं थोडंसं भान आपण ठेवावं. या सुंदर बागेला हृदयातून जपावं.

**बाबा देशपांडे**/ ९४२३६१३२२६

## प्रासंगिक

वैभव डांगे

# भारतातील ताज्या जीडीपी वाढीचा वेग

भारताचा अलिकडचा त्रैमासिक जीडीपी आकडा- सरकारी अंदाजानुसार ८ टक्क्यांपेक्षा जास्त- पुन्हा एकदा जागतिक निराशावाद्यांना सौम्य पण स्पष्ट संदेश देतो. भारताची अर्थव्यवस्था मेल्याची अफवा फारच अतिशयोक्त होती. जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्था मंदीच्या काठावर चालल्या असताना आणि भू-राजकीय अनिश्चितता जागतिक व्यापारात धुंदी माजवत असताना, भारताने केवळ वाढीचा वेग कायम ठेवला नाही, तर त्यात थोडेसे 'टर्बोचार्जर'ही बसवले आहे.

या वाढीच्या केंद्रस्थानी आहे सरकारचा अविरत पायाभूत सुविधांवरील भर. अलिकडच्या बजेटमध्ये सार्वजनिक भांडवली खर्चात ३० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली असून त्याचा परिणाम आता अर्थव्यवस्थेत स्पष्टपणे दिसतो. राज्यांमध्ये धावणारे नवे महामार्ग, नवीन विमानतळ, रेल्वे आधुनिकीकरणाची विक्रमी गती, बंदर क्षमता वाढ आणि मालवाहतूक मार्गांचे जाळे- यांनी बांधकाम, लॉजिस्टिक्स आणि संबंधित क्षेत्रांना नवसंजीवनी दिली आहे. जागतिक पुरवठा शृंखला आजकाल थोड्या संवेदनशील किशोरवयीन मुलांप्रमाणे- अनपेक्षित, भावनिक आणि लवकर बिघडणाऱ्या- वागत असताना भारताचा देशांतर्गत कॅपेक्सचक्र म्हणजे घरातील समजूतदार वडिलधारी व्यक्तीच ठरला आहे.



उत्पादनक्षेत्रानेही या तिमाहीत उत्तम कामगिरी केली. इलेक्ट्रॉनिक्स, ऑटो आणि फार्मा या क्षेत्रांच्या जोरावर उत्पादन क्षेत्रातील जीव्हीए वाढ चांगली राहिली. २ लाख कोटी रुपयांहून अधिकच्या पीएलआय योजनांनी कंपन्यांना उत्पादन वाढवण्यास प्रवृत्त केले आहे आणि जागतिक पुरवठा साखळीचे विविधीकरण भारताच्या बाजूने जोर धरत आहे. कारखान्यांमध्ये आता मंत्री येणार म्हणूनच दिवे लागतात असे नाही- खरंच काम सुरू आहे. क्षमता वापर ७४ टक्क्यांच्या वर गेला असून वस्तूंच्या किमती कमी झाल्याने उद्योगांना दिलासा मिळाला आहे.

आणि मग, जीएसटी सुधारांचा परिणाम. एकेकाळी जीएसटीमुळे अर्थव्यवस्था कोसळेल असे भाकीत करणाऱ्या टीकाकारांना आता थोडे गोंधळायला झाले आहे. कारण अलिकडील जीएसटी दरकपातींमुळे-विशेषतः जीवनावश्यक आणि सर्वसामान्य वापराच्या वस्तूंवरील-उपभोगाला चांगला हातभार लागला. आज महिन्याला सरासरी १.६-१.७ लाख कोटी रु. जीएसटी संकलन होत आहे. कमी दर, अधिक अनुपालन आणि वाढलेला महसूल-ही समीकरणे आजही काहींना क्वांटम फिजिक्ससारखीच गुंतागुंतीची वाटतात.

या दमदार त्रैमासिक आकड्यांचा वार्षिक वाढ दरावरही सकारात्मक परिणाम होणारच. उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वेग टिकून आहे आणि सरकारी कॅपेक्स सतत वाढत असल्याने वर्षभराचा वाढ दर ६.८ टक्के ते ७.२ टक्क्यांच्या मजबूत पट्ट्यात राहू शकतो. जगाच्या तुलनेत हे फक्त चांगलेच नाही-थेट 'ॲथलेटिक' आहे.

अमेरिकेच्या नव्या टॅरिफ धोरणांचा विचार करता ही आर्थिक कामगिरी भारतासाठी रणनीतिकदृष्ट्या आणखी फायदेशीर आहे. सक्षम देशांतर्गत अर्थव्यवस्था भारताला व्यापार चर्चेत आत्मविश्वास देते. उत्पादनक्षेत्रातील वाढ भारताला जागतिक पुरवठा शृंखलेत विश्वसनीय 'बॅकअप प्लॅन' बनवते- जे अमेरिकेलाही हवे आहे. आणि मजबूत करसंकलनामुळे भारत व्यापार वादात दयाभाव मागणारा देश न राहता, समोरासमोर बोलणारा देश बनतो.

ज्यांनी भारताची अर्थव्यवस्था संपली अशी घोषणा केली होती, ते आता शांतपणे विचार करत आहेत की मृत अर्थव्यवस्था सतत जगातील सर्वांत जास्त वाढ दर कसा काय दाखवते? कदाचित अर्थव्यवस्थेने त्यांचे अहवाल वाचलेच नसतील. कदाचित ती 'निराशावाद' नावाची भाषा बोलतच नसेल.

एकूणच, या तिमाहीचे जीडीपी आकडे फक्त वाढ दाखवत नाहीत-ती वाढ कशी, कुठून आणि किती रणनीतीने मिळते हेही दाखवतात. पायाभूत सुविधांवरील खर्चाने कणा मजबूत केला, उत्पादनक्षेत्राने स्नायू वाढवले, जीएसटी सुधारांनी रक्ताभिसरण सुरळीत केले आणि भू-राजकीय चातुर्याने शरीर पूर्ण तंदुरुस्त ठेवले.

भारताची अर्थव्यवस्था फक्त जिवंत नाही- ती धावत आहे, स्ट्रेचिंग करत आहे आणि वेळोवेळी स्प्रिंटही मारत आहे. आणि ज्यांनी तिचा मृत्युलेख आधीच लिहून ठेवला आहे, त्यांच्यासाठी ही तिमाही एक छोटासा सल्ला देते : मसुदा पुन्हा एकदा वाचा.

संस्थापक व संचालक, बिल्ड इंडिया फाउंडेशन
(सार्वजनिक धोरण तज्ज्ञ)

### संकटातील संधिसाधूपणा!

गेल्या २-३ दिवसांत इंडिगो एअरलाईन्सची उड्डाणे अचानक रद्द झाल्याने हजारो प्रवासी अडचणीत सापडले. प्रवासाची पूर्वतयारी, वेळेचे नियोजन आणि आर्थिक भार या सगळ्यांवर विपरीत परिणाम झाला. मात्र या संपूर्ण गोंधळात सर्वांत विचलित करणारी गोष्ट म्हणजे इतर एअरलाईन्सनी दाखवलेला संधिसाधूपणा. इंडिगोची परिस्थिती बिकट होताच इतर कंपन्यांनी आपल्या तिकिटांचे दर अक्षरशः दुप्पट-तिप्पट केले.

डायनॅमिक प्राइसिंग हे आधुनिक हवाई प्रवासाचे वैशिष्ट्य असले तरी अशा संकटात त्याचा अतिरेक करणे हे केवळ व्यावसायिक नव्हे, तर नैतिकतेच्या कसोटीवरही चुकीचे ठरते. प्रवासी आधीच अडकलेले असताना त्यांच्याकडून जास्तीत जास्त नफा कमावण्याचा प्रयत्न हा उद्योगाच्या प्रतिष्ठेलाही धक्का देणारा आहे. अशा परिस्थितीत एअरलाईन्सनी मानवी दृष्टिकोन ठेवणे अपेक्षित असते. सरकार किमतींवर थेट नियंत्रण ठेवत नसले, तरी अशा विशेष प्रसंगी तात्पुरता 'फेअर कॅप' लागू करणे किंवा डीजीसीएमार्फत इतर एअरलाईन्सना सुसंगत मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रमाणेच त्यांची आर्थिक सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. या संपूर्ण प्रसंगातून स्पष्ट होते की हवाई प्रवासातील पारदर्शकता, दरांची स्थिरता आणि ग्राहकहिताची बांधिलकी ही सरकार आणि एअरलाईन्सकडून केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतही दिसणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रवाशांच्या प्रत्येक तिकिटामागे त्यांचा वेळ, पैसा आणि अपेक्षांची गुंतवणूक दडलेली असते. त्या गुंतवणुकीला तडा जाऊ नये यासाठी संकटकाळात हवाई वहातूक उद्योगाने अधिक संवेदनशील आणि जबाबदार वर्तन करणे अत्यावश्यक आहे. संकटाच्या काळात दाखवलेली संवेदनशीलता उद्योगाप्रति दीर्घकालीन विश्वासाची वीट ठरते आणि जिथे ग्राहकांचा विश्वास मजबूत असतो तिथे नफ्याची वाढ आपोआपच होते.

**अनिकेत शेटे**/पुणे

## आजचे संघगीत-६९

रविवार, ७ डिसेंबर २०२५

### घरोघर संघाचा संदेश नेउ...

घरोघर संघाचा संदेश नेउ या संघाचा आदेश ॥धृ.॥

बघाल तिकडे आत्मविस्मृती
नमती बांधव सत्तेपुढती
स्वार्थास्तव संतत धडपडती
जाग आणुनी देता आपण सळसळेल आवेश ॥१॥

वैभवशाली राष्ट्रोत्थापन
पवित्र व्रत हे केले धारण
झिजू तयास्तव अखंड कणकण
उगीच नाही शोभा म्हणुनी चढवियला गणवेश ॥२॥

दिशादिशांना विभिन्न चाली
जाति पंथ जरि अनेक बोली
तरी एकता निवसे खाली
हिंदुत्वाचा सागर त्यावर क्षणभंगुर हा फेस ॥३॥

सतार अपुल्या कर्तृत्वाची
नेत्याहाती दिधली साची
असेल इच्छा छेडायाची
तशी छेडली जावो, नुरला स्वार्थाचा लवलेश ॥४॥

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# कुटुंबाला प्रेमाच्या धाग्यात बांधून ठेवा- राष्ट्रसंत ललित प्रभु महाराज

**जितूर,/प्रतिनिधी-** संसारा शिवाय सुख नाही आणि आनंदही नाही. चुकला त्याला क्षमा करणे म्हणजे माणुसकीचा धर्म जोपासणे. सुखाची प्राप्ती मिळवायची असेल तर कुटुंबाला प्रेमाच्या एका धाग्यात बांधून ठेवा असा उपदेश राष्ट्रसंत ललित प्रभ महाराज यांनी केला.



लोककल्याणकारी समितीच्या वतीने ता. ६ ते ८ डिसेंबर या कालावधीत राष्ट्रसंत ललितप्रभ महाराज यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आला असून याप्रसंगी (शनिवार) ता. ६रोजी सकाळी ८ वाजता ललितप्रभू महाराजांचे शहरात आगमन झाले. यावेळी कलशधारी महिला, अश्वरथ, लेझीम,झाकी यांच्यासह विविध उपक्रमांनी शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शोभा यात्रेचा समारोप झाला. त्यानंतर ललित प्रभू महाराजांनी आपल्या प्रवचनातून लोकांना जीवन जगण्याचा मार्ग या विषयावर प्रवचन दिले.यावेळी ललितप्रभा महाराज म्हणाले की, राग हा क्षणभराचा असतो परंतु रागामुळे आपले भविष्य खराब होते. तर रागामुळे नात्यातला गोडवा कमी होऊन जीवनातील आनंद नष्ट होतो. आयुष्य खूप छोटे आहे.तेव्हा रागा पेक्षा प्रेमाला जवळ करा. रागाला सहजतेणे घेऊन समोरच्याला हसत उत्तर द्या.नात्यात गोडवा निर्माण करून क्षमा करा. त्यातच तुमच्या जीवनाचा खरा आनंद लपलेला आहे. यावेळी डॉ. मुनीश्री शांतीप्रिय महाराजांची आपले विचार मांडले. घर बांधण्यासाठी उत्तम सिमेंट आणि स्टील लागते तसेच चांगला समाज घडवण्यासाठी उत्तम संस्काराची गरज असते. जीवन हे अमूल्य आहे ते आळशीपणात घालवू नका. असा उपदेश त्यांनी उपस्थित भक्तांना केला.

यावेळी परभणी, नांदेड,बोरी, जालना या ठिकाणाहून अनेक भक्तसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरोज गट्टानी तर आभार ब्रिजगोपालजी तोष्णीवाल यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६९ वृक्षारोपण करून अभिवादन

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील सामाजिक कार्यकर्ते मुकेश सदर यांच्यावतीने शहरातील गाडगेबाबा नगरात ६९ वृक्षारोपण करून अभिवादन करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुकेश सदर, शुभम गेंदे, विलास सरोडे, अर्जुन काळे, कैलास कांबळे, राहुल गायकवाड, युवराज नंदनवरे, रवी हातागळे, गौतम खंदारे, दीपक घोबाळे, नय्युम शेख, रफिक शेख, युसुफ शेख, मुन्ना सावंत, रामा गवळी, बालू मस्के यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

### वाघाळा येथील ऊस उत्पादकास मारहाण करीत धमकावणाऱ्या चौघांविरुध्द पाथरी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** 'तुझा ऊस कारखाण्यास जाऊ देणार नाही, तू ऊस कसा कारखान्यास आणतोस ते मी बघतोच' असे म्हणत पाथरी तालुक्यातील वाघाळा येथील ऊस उत्पादकास मारहाण करीत धमकविणाऱ्या विकास घुंबरे यांच्यासह अन्य तीघा साथीदारांविरुध्द पाथरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाघाळा येथील ऊस उत्पादक शेतकरी सुशील नागोराव घुंबरे यांनी पाथरी पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. या तक्रारीत, वाघाळा येथील देवस्थानची पडीक जमीन काही वर्षापूर्वी ग्रामस्थांनी बैठक घेऊन वहितीकरीता आपणास तोंडी कराराद्वारे दिली. त्या जमीनीत आपण ऊसाची लागवड केली. त्यापैकी काही क्षेत्रावरील ऊस आपण कारखान्यास देणार होतो. परंतु, २ डिसेंबर रोजी सायंकाळी ११.३० वाजेच्या सुमारास आपण व आपले पुतणे कर्तिक किरण घुंबरे हे शेत जमीनीत काम करीत असतांना विकास रतनराव घुंबरे, ज्ञानोबा सर्जेराव घुंबरे, स्वराज प्रल्हादराव घुंबरे, प्रल्हाद परमेश्वर घुंबरे हे चौघे शेतात आले. व ही जमीन तुमची नाही, मारोती देवस्थानची आहे, आम्ही हा ऊस कारखान्यास जावू देणार नाही, नवीन ऊस ट्रॅक्टर घालून मोडून टाकू, अशी धमकी दिली व आपल्या गालावर जोरात चापट मारली. ऊस आम्ही फ ुकून टाकू, तुम्ही ऊस तोडून कारखान्यास नेला तर जिवंतसुध्दा ठेवणार नाही, असे धमकावल्याचे तक्रारीत म्हटले. घुंबरे यांनी व्हॉट्सअप ग्रुप तयार करुन गावातील अनेकांना या ग्रुपशी जोडून त्या माध्यमातून इतरांना एकत्र करुन चिथावणी देत असल्याचेही तक्रारीत नमूद केले.

### चोरवड येथील हिरकणी स्कूल मध्ये महापरिनिर्वाण दिननिमित्त अभिवादन




**शांतीला शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील चोरवड येथिल हिरकणी स्कूल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिन निमित्तविनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अशोक लवटे,राजू पाटील, सदानंद दुबे, मारुती जोगदंड, धुराजी जाहीर, नितेश तांबे, वर्षा दुबे, यास्मिन तांबोळी, नारायण गांजले, राहुल शिंदे, गौतम कुमार, रामदास कदम, अंजीत कुमार, सोपान काळबांडे,अनिल रायबोले, बाळू फुलारी, वैष्णव लांडगे, श्रवण नायक, बरून नायक, रामदास सोनकांबळे, प्रेमानंद मस्के, अमल सिंह,रणजित शिंह, पल्लवी चामले, शारदा सूर्यवंशी,अर्चना नळगिरे, भाग्यश्री बेंबळगे, ज्योती दहिफळे,स्नेहल लवटे, श्रुष्टि लांडगे,श्रुती किरडे, जनाबाई कदम, रोहिणी ठवरे, युवराज ठवरे, अमोल लवटे, राम कवडे, माऊली लवटे, बंडू देवकते आदीं उपस्थित होते .

### के.के.एम.महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन

**मानवत,/प्रतिनिधी-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त के.के. एम महाविद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संस्थेचे सचिव श्री.विजय कुमारजी दलाल,संचालक श्री. दिलीप हिबारे, प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे उपराचार्य डॉ.के.जी हुगे, डॉ. शिंदे सुभाष पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे आणि इतर बहुसंख्य सहकारी कर्मचारी उपस्थित होते.




सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## इन्स्पायर मानक राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये श्री. संत ज्ञानेश्वर विद्यालय केरवाडी या शाळेच्या प्रयोगाचे सादरीकरण

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** महाराष्ट्रातील न्यू कॉलेज शहापूर ता.जि.भंडारा येथे यावर्षीचे राज्यस्तरीय इन्स्पायर मानक विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सृजनशील व रचनात्मक विचार रुजविण्यासाठी केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाकडून इंस्पायर अवार्डची योजना २००९ पासून सुरु करण्यात आली आहे. इंस्पायर अवार्ड मानक योजनेत इयत्ता सहावी ते दहावीतील विध्यार्थी आपल्या प्रयोगाचे सादरीकरण करत असतात. यामध्ये सोशिओ इकोनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित.श्री.संत ज्ञानेश्वर विद्यालय केरवाडी ता.पालम जि.परभणी या शाळेच्या प्रयोगाची निवड झाली होती.विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रदर्शित करण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.इन्स्पॉयर अवॉर्ड मानक जिल्हास्तरीय प्रदर्शन परभणी येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी शाश्वत पर्यावरणासाठी प्लास्टिकचा पुनर्वापर याविषया अंतर्गत प्लास्टिकच्या टाकाऊ पदार्थापासून दोरी किंवा प्लास्टिक पट्टी किंवा शोभेच्या इतर वस्तू तयार करणे या उपकरणाचे सादरीकरण केले. यामध्ये प्रयोगाची जिल्हा स्तरावरून राज्यस्तरावर निवड झाली होती. यामध्ये कु.समीक्षा आष्टुरकर,स्नेहा शेटे या विद्यार्थिनींनी आपल्या स्वतःच्या कल्पनेतून हे उपकरण तयार केले होते. स्वतःच्या कल्पक बुद्धीतून तयार केलेल्या त्यांच्या या प्रयोगाला भरपूर प्रतिसाद मिळाला. त्यांना मार्गदर्शक म्हणून शाळेच्या शिक्षिका श्रीमती कुगणे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.संस्थेचे अध्यक्ष मा.श्री सूर्यकांत कुलकर्णी, माणिकताई कुलकर्णी,अजिंक्य कुलकर्णी सचिव गंगाताई माने,सारंग सर, प्रल्हाद पांचाळ,विष्णू जाधव, शाळेचे मु.अ.लक्ष्मण पौळ सुरेखा चामले,उषा किरडे, मनोज गडमवाड, संगीता पोळ,पंकज कुलकर्णी, संदीप गडगिळे,गोपीनाथ शिनगारे, कुंडलिक जाधव, लता गडगिळे,उर्मिला राऊत, विद्या बडोले व शाळेतील सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## पेठशिवणी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेबांना विनम्र अभिवादन

**पालम,/प्रतिनिधी-** पालम तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी येथे महामानवाला पुष्पहार अर्पण केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महा परिनिर्वाण दिना निमित्त तालुक्यातील पेठशिवणी येथे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सूतगिरणी परिसरात आयोजित केलेल्या कार्यक्रमात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.



या वेळेस सूतगिणीचे संचालक वैजनाथ हत्तीआंबिरे.रानबा वाघमारे संभाजी वाडेवाले. खाडे रमेश. मोतीराम जोंधळे. हनुमंत कलवले.व्यंकटेश मोरताटे प्रकाश वाघमारे. पत्रकार चांद तांबोळी व शिदे तसेच स्थानिक नागरिक आणि सूतगिरणीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांनी देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

विचारांना उजाळा पुष्पहार अर्पण केल्यानंतर, उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समानता, न्याय आणि बंधुताया मूल्यांवर आधारित विचारांवर चर्चा केली. देशाच्या लोकशाही साठी आणि समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी बाबासाहेबांनी केलेल्या अथक प्रयत्नांची यावेळी आठवण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करून, त्यांच्या महान स्मृतीस आदरांजली वाहण्यात आली.



**जिंतूर- शहरातील आमदार कॉलनीतील श्री स्वामी समर्थ केंद्रात दत्तजयंती उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीदत्त जन्मोत्सवानिमित्त सात दिवसीय पारायण, होम-हवन, मल्हारीयान जप, आरती तसेच पालखी सोहळा असे धार्मिक कार्यक्रमात महिलां सहभागी दिसत आहेत.**

## प्रभुकृपा विद्यालयात महापरिनिर्वानदिन साजरा

**जिंतूर,/प्रतिनिधी-** प्रभुकृपा माध्यमिक विद्यालय वाघी बोबडे येथे घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी म्हणजेच महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संतोष साखरे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद साळवे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सत्यजित वसमतकर सर यांनी केले तसेच या कार्यक्रमाच्या दरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरुषांना किंवा त्यांच्या कार्याला कुठल्याही धर्म किंवा जातीपुरतं मर्यादित न ठेवता त्यांच्या कार्यांचा विस्तार करावा कारण त्यांचे काम समाजातील सर्व घटकांवर प्रभाव पाडणारे काम आहे असे आवाहन केले. या कार्यक्रमाला उद्धव ठोंबरे सर, धुळे सर पाटील सर, सरगर सर, गलांडे सर, मगर सर मुंडे मॅडम तसेच संदीप रोहिनकर ,शिवदास रोहिनकर आदींची उपस्थिती होती.

## ट्वेन्टी वन सुगर्स चा पहिला हप्ता २,७२५ रु.जाहीर

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ तालुक्यातील सायखेडा येथील ट्वेन्टी वन सुगर्स या साखर कारखान्यावर पहिल्या उचलीच्या मागणीसाठी गेली चार दिवसांपासून सुरू असलेले ठिय्या आंदोलन उपविभागीय अधिकारी संगिता चव्हाण यांच्या मध्यस्थीने सुटले असून या कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या उसाला प्रती टन २,७२५ रुपयांचा पहिला हप्ता देण्याचे लेखी दिल्यानंतर शेतकऱ्यांकडून आंदोलन मागे घेण्यात आले. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील ऊसाच्या पहिल्या उचलीची कोंडी फ ुटली आहे.



बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सुरु केलेल्या ऊसदारांच्या आंदोलनाचे लोन परभणी जिल्ह्यात पसरुन सोनपेठ तालुक्यातील ट्वेन्टी वन सुगर्स या कारखान्यावर दि. १ डिसेंबर पासून शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले होते. युवा शेतकरी संघर्ष समिती,स्वाभिमानी शेतकरी संघटना, किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी यांचे मागील चार दिवसांपासून कारखाना परिसरात हे आंदोलन सुरू होते.दिवसेंदिवस आंदोलन तिव्र होत असल्याचे पाहून कारखाना प्रशासनाने गुरूवार दि.४ डिसेंबर रोजी याची दखल घेऊन तोडगा काढण्यासाठी, पाथरीच्या उपविभागीय अधिकारी संगिता चव्हाण यांच्या अध्यक्षतेत बैठक घेतली. या बैठकीस सोनपेठचे तहसिलदार सुनिल कावरखे, सोनपेठचे पोलीस निरिक्षक अशोक गिते, फौजदार अजय किरकन, ट्वेन्टी वन सुगर्स चे विजयराव देशमुख, लक्ष्मीकांत देशमुख,कॉ. राजन क्षीरसागर,उदय देशमुख,कॉ.अजय बुरांडे, सुधीर बिंदू, किशोर ढगे, लक्ष्मण पौळ,विश्वंभर गोरवे, रामेश्वर मोकाशे,ऋषीकेश जोगदंड, सुरेश ईखे , ओमकार पवार यांच्या सह परीसरातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत ऊस दरावर यशस्वी चर्चा होऊन यंदाच्या गाळप हंगामात पहिली उचल प्रती टन २ हजार ७२५ रुपये देण्यासाठी कारखाना प्रशासनाच्या वतीने जाहीर करण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. चार दिवसांनंतर तब्बल सहा तास झालेल्या चर्चेनंतर रात्री आठ वाजता ही घोषणा कारखान्याच्या वतीने जाहीर करण्यात आली.

## श्रमदानातून जलक्रांतीची सुरुवात; बोर्डी येथे वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील बोर्डी गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामविकासाला चालना देण्यासाठी आज एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागात पाणीसाठा वाढवणे, जलस्त्रोतांची उपलब्धता सुधारणा तसेच शेतीसाठी स्थिर जलव्यवस्था निर्माण करणे या उद्दिष्टांसाठी गावकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने पुढाकार घेत वनराई बंधारा बांधण्याचे कार्य श्रमदानातून पूर्ण केले.

पंचायत समिती जिंतूरचे गटविक ास अधिकारी सुभाष मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. मानकर यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करून गावकऱ्यांना प्रोत्साहन देत योजनेंतर्गत उपलब्ध सुविधा व आवश्यक मार्गदर्शन पुरविले. या कामात गावातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी विशेष उत्साहाने सहभाग घेतला. पाणी, माती वाहून नेणे, बंधाऱ्याची भिंत घट्ट करणे, पसरट माती समतल करणे यांसाठी महिलांनी मोठ्या संख्येने योगदान दिले. त्यांच्या सहभागामुळे काम अपेक्षेपेक्षा अधिक वेगाने पूर्ण झाले. वनराई बंधाऱ्याचे लाभ गावातील हा बंधारा पुढील काळात पावसाळ्यातील पाणीसाठा वाढवेल, परिसरातील भूजलस्तर उंचावेल, विहिरी, बोअरवेल यांना पाणीटंचाई कमी होईल, रब्बी हंगामातील शेतीला पाण्याचा



आधार मिळेल. गट-विकास अधिकारी मानकर यांनी सांगितले की, सरकारच्या विविध जलसंधारण योजनेसोबत गावकऱ्यांचा सहभाग असेल तर पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल. ग्रामस्थांनी बंधाऱ्याच्या बांधकामावेळी पुढील काही आठवड्यांत आणखी काही लहान-मोठे जलसंधारण प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायत स्तरावर विशेष समितीही गठीत करण्यात आली आहे. बोर्डी गावातील हा उपक्रम जिंतूर तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरत असून, ग्रामीण भागात जलसंधारणाबाबत लोकजागृती वाढीस लागल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# जि.प. व पं.स. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची कंबर कसली

## ७ ते १२ डिसेंबरदरम्यान आठ तालुक्यांत संघटन दौरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**



आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाने तयारीला वेग दिला असून ७ ते १२ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये संघटन बळकटीकरण आणि निवडणूक रणनीतीसाठी विशेष दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा दौरा पार पडणार आहे.







दौऱ्यादरम्यान होणाऱ्या बैठकीत बूथस्तरावरील संघटन मजबूत करणे, तरुण कार्यकर्त्यांना सक्रिय भूमिकेत आणणे, तसेच सामाजिक प्रश्न, विकासकामे आणि स्थानिक मुद्द्यांवर प्रभावी प्रचार मोहिम उभारणे याबाबत स्पष्ट निर्देश दिले जाणार आहेत. मतदारांचा विश्वास जिंकण्यासाठी समन्वित आणि नियोजनबद्ध मोहिम उभारण्यावर पक्षाचा भर आहे.

पक्ष पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, जिल्ह्यातील विकासासाठी सक्षम आणि जनसंपर्कात मजबूत कार्यकर्ता गरजेचा असून राष्ट्रवादी काँग्रेस आगामी निवडणुकीत दमदार लढत देण्यास सज्ज आहे.'' पक्षाच्या सूत्रांनुसार उमेदवारांच्या पहिल्या यादीची घोषणा लवकरच होणार आहे.

जिल्ह्यात निवडणुकीचे वातावरण तापू लागले असताना राष्ट्रवादी काँग्रेसने मोर्चेबांधणीचा धडाका सुरू केल्याने आगामी निवडणूक चुरशीची होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बहुजन योद्धा सामाजिक संघटनेतर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटनेतर्फे शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे, खलीफा कुरेशी,मसुद शेख, इरफान कुरेशी, बाबा मुजावर, जीवन देशमुख, जालिंदर पांचाळ, विशाल शिंगाडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने पुरोगामी चळवळीत मोठी पोकळी




## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत व राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्ष तसेच 'आपलं घर' प्रकल्पाचे आधारवड पन्नालाल सुराणा यांच्या निधनामुळे पुरोगामी चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी सांगितले. नळदुर्ग येथील 'आपलं घर' येथे ४ डिसेंबर रोजी आयोजित शोकसभेत ते बोलत होते.

माजी मंत्री मधुकरराव चव्हाण म्हणाले की, पन्नालाल सुराणा यांचे संपूर्ण आयुष्य मानवसेवेसाठी वाहिलेले होते. त्यांच्या निधनाने समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. अनाथ मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असून येणाऱ्या पिढ्यांसाठी ते प्रेरणादायी ठरेल. सुराणा यांची समाजकार्याची बांधिलकी, मूल्यनिष्ठ भूमिका आणि कणखर विचार आजही समाजाला दिशा देणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.



या शोकसभेस माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, राष्ट्रसेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, आमदार प्रविण स्वामी, पन्नालाल सुराणा यांचे पुत्र प्रभास सुराणा, कन्या आरती खरीदे, मुकुंद खरीदे, गुंडू पवार, ड. सयाजी शिंदे, देविदास वडगावकर, बसवराज नरे, कॉ. अरुण रेनके, सुनिल पुजारी, निजगुन स्वामी, विलास वकील, दयानंद काळुंके, मानवलोकचे अनिकेत लोहिया, संतोष बुरंगे, सरीता उपासे, प्रल्हाद दुगले, माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण, उषा क्षीरसागर, सुनिल क्षीरसागर यांच्यासह 'आपलं घर' येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीशैल बिराजदार यांनी केले.

# जवाहर नवोदय विद्यालयास श्री श्री गुरुकुल विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.७ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल शाळेतील विद्यार्थ्यांनी तुळजापूर येथील जवाहर नवोदय विद्यालयास बुधवारी (दि.३) भेट देऊन तेथील दैनंदिन शैक्षणिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. नवोदय विद्यालयात प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती मिळावी व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, तसेच पुढील शिक्षणाबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विद्यालयातील वस्तीगृह, क्रीडांगण, प्रशस्त वर्गखोल्या आणि ग्रंथालयाची पाहणी केली.

यावेळी विद्यालयातील शिक्षक जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम आणि उपलब्ध सुविधा याबद्दलचे मार्गदर्शन दिले. येणाऱ्या १२ डिसेंबर रोजी नवोदय विद्यालयाची प्रवेश परीक्षा होणार असून या परीक्षेत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत, उच्च दर्जाचे CBSE शिक्षण उपलब्ध होते याची प्रत्यक्ष माहिती व्हावी, या हेतूने विद्यार्थ्यांना भेटीस पाठविल्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे यांनी सांगितले.

या शैक्षणिक क्षेत्रभेटीत शाळेतील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. भेट यशस्वी करण्यासाठी शिक्षक विशाल महाबोले, धनराज साखरे आणि चालक दीपक नाटेकर यांनी परिश्रम घेतले.

# कळंबमध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ डिसेंबर -**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त कळंब येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध मान्यवरांनी उपस्थित राहून डॉ. आंबेडकरांना आदरांजली अर्पण केली.

यावेळी भास्कर सोनवणे, अनिल हजारे, डी.जी. हौसलमल, सतपाल बनसोडे, डॉ. साजेद चाऊस, उदयचंद्र खंडागळे, सतपाल बचुटे, सिद्धार्थ वाघमारे, अनिल गाडे, राहुल गाडे, अमर गायकवाड तसेच सरला सरवदे व वैशाली गाडे यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# तेरखेडा येथे रब्बी ज्वारी क्रॉपसॅप शेती शाळेला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे ४ डिसेंबर रोजी गावातील उकरंडे शिवारात रब्बी ज्वारी क्रॉपसॅप शेती शाळेचे आयोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले. जागतिक मृदा दिन लक्षात घेऊन शेतकऱ्यांना जमिनीचे आरोग्य, सुपिकता तपासणी व माती व्यवस्थापन याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात सहाय्यक कृषी अधिकारी विश्वेकर व यादव यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत माती परीक्षणाचे महत्त्व, जमिनीच्या पोषणद्रव्यांतील संतुलन आणि आरोग्य तपासणीचे फायदे सविस्तर समजावले. तसेच कृषी अधिकारी सूर्यवंशी यांनी ज्वारी पिकातील लष्करी आळी नियंत्रण, पाणी व्यवस्थापन तंत्र, तसेच महाविस्तार ए-आय ॲपचा प्रभावी वापर याबाबत मार्गदर्शन केले. शेती शाळेत दिलेल्या माहितीमुळे उत्पादनात वाढ, खर्चात बचत आणि रोगनियंत्रणाच्या नव्या पद्धतींची अधिक माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाला शेतकरी मंगेश कडवकर, बालाजी घुले, नाना खामकर, अनिरुद्ध उकरंडे, विजय उकरंडे, नितीन उकरंडे यांसह गावातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री सिद्धीविनायक सोसायटीतर्फे खामसवाडी येथे माती व पाणी परीक्षण संकलन केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

जागतिक मृदा दिनानिमित्त श्री सिद्धीविनायक सोसायटी, धाराशिव यांच्या वतीने खामसवाडी येथे माती व पाणी परीक्षण संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य तपासणीसाठी अत्यावश्यक आणि वैज्ञानिक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या आहेत.

नवीन सुरू करण्यात आलेल्या या केंद्रात मातीतील प्रमुख पोषकतत्त्वांचे विश्लेषण, पाण्याची गुणवत्ता तपासणी, संतुलित खत व्यवस्थापन, तसेच पिकउत्पादन वाढीसाठी तज्ज्ञ मार्गदर्शन अशा सेवा अल्पदरात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मातीचे आरोग्य वैज्ञानिक पद्धतीने तपासल्यास खतांचा योग्य वापर, खर्चावर नियंत्रण आणि उत्पादनात लक्षणीय वाढ साध्य होऊ शकते, असे आयोजकांनी सांगितले.

प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर यांनी माती परीक्षणाचे फायदे स्पष्ट करताना सांगितले, अचूक मृदाविश्लेषण केल्याने खतांचा समतोल वापर करता येतो. त्यामुळे उत्पादनात १५



ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ होते. अनावश्यक रासायनिक खतांचा वापर कमी होऊन शेतकऱ्यांचा खर्चही लक्षणीयरीत्या घटतो. परीक्षणातून मातीतील कि, सेंद्रिय कार्बन, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरता समजतात, ज्यामुळे वैज्ञानिक शेती, पिक फेरपालट आणि टिकाऊ शेती शक्य होते.

कार्यक्रमास श्री सिद्धीविनायक परिवारातील गजानन पाटील, प्रयोगशाळा प्रमुख चंद्रशेखर गाडेकर, बलराम कुलकर्णी, तसेच गावातील शेतकरी अनिल शेळके, नाना भुतेकर, विश्वास कोकणे, श्रीनिवास झोरी, विजयकुमार झोरी, राजेश गरड, सादिक सय्यद, श्रीमंत शेळके, सतिश वैद्य, निशिकांत महाजन, सुशीलकुमार पारील, दत्तात्रय शेळके, महेश शेळके, श्रीमंत पाटील, प्रशांत सुरवसे, सुशिल यादव, कुलदीप सावंत, विकासकुमार झोरी, उध्दव शेळके, दत्ता जोशी यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

जागतिक मृदा दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम निरोगी मृदा - भरघोस उत्पादन हा संदेश अधिक दृढ करणारा ठरत असून, शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीकडे प्रवास करण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

नवीन केंद्रामुळे उत्पादनक्षमता वाढविणे, खतांच्या खर्चात बचत करणे आणि टिकाऊ शेती पद्धती अंगीकारणे अधिक सुलभ होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या २५ विद्यार्थ्यांना शिफ्ट अबॅकस परीक्षेत सुवर्णपदक




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ डिसेंबर -**

नुकत्याच जाहीर झालेल्या शिफ्ट अबॅकस परीक्षेच्या निकालात स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. इयत्ता पहिली ते पाचवीतील अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता, त्यापैकी २५ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावत शाळेचा व पालकांचा गौरव वाढवला.

गेल्या दोन महिन्यांपूर्वी घेण्यात आलेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी सादर केली.

सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या संचालिका श्रीता पाटील यांच्या हस्ते गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मुख्याध्यापिका सविता लोहार यांनीही या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहन दिले.

वय वर्ष ६ ते १२ या वयोगटातील विद्यार्थ्यांची श्रवण कौशल्य, स्मरणशक्ती, एकाग्रता, आत्मविश्वास व गतिशील अंकगणितीय कौशल्य विकसित व्हावीत यासाठी अबॅकस परीक्षा आयोजित केली जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता पाचपटीने वाढण्यास मदत होते, तसेच क्षेत्रीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होते, असे संचालिका श्रीता पाटील यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, बेबी सरोजा पवार, व्यंकट वचने तसेच सर्व संचालक व शिक्षकांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट वचने, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर देशपांडे यांनी केले.

## मार्डीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ डिसेंबर -**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव महान विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि.६ डिसेंबर रोजी लोहारा तालुक्यातील मार्डी येथे डॉ. बाबासाहेब आबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उत्तम भालेराव, नागनाथ भालेराव, कलाप्पा दुपारगुडे, तुकाराम कदम, व्यंकट माळी, संजय भालेराव, रोहन भालेराव, शिवाजी भालेराव, वैभव भालेराव, आशुतोष भालेराव, आदर्श आखाडे, शुभम भालेराव, आदर्श भालेराव, विशाल भालेराव, यश मस्के, विनोद मस्के, महेंद्र भालेराव, अंबादास भालेराव यांच्यासह आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोराखळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी हस्तकला व प्रकल्प प्रदर्शनाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.७ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील चोराखळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित विद्यार्थी हस्तकला व प्रकल्प प्रदर्शनास शुक्रवारी ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले विज्ञान, भूगोल, पर्यावरण व भाषा विषयांवरील विविध मॉडेल्स प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरले.

शाळेच्या आवारात उभारलेल्या स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता अभियान, वाहतूक नियोजन, ग्रामपंचायत रचना अशा विविध विषयांची मॉडेल्स मांडली होती. पाहुण्यांना आणि पालकांना प्रत्येक प्रकल्पाची माहिती विद्यार्थी स्वतः देत असल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास व सादरीकरण कौशल्य स्पष्टपणे जाणवत होते.



मुख्याध्यापिका व शिक्षकांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञानावर मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून शिकवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यांच्या हस्तकौशल्याचा विकास, विचारशक्ती वृद्धिंगत करणे आणि आत्मविश्वास वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अशा प्रकारचे उपक्रम दरवर्षी शाळेत राबवले जातात.

गावातील मान्यवर, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धन केले.

ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकता आणि शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक करून शाळेच्या उपक्रमाचे अभिनंदन केले.

एकूणच, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारे आणि गावाच्या शैक्षणिक वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे असे हे प्रदर्शन यंदाही संस्मरणीय ठरले.

# रब्बी हंगाम २०२५ : राज्यात ज्वारी-गहू-हरभरा-करडई-जवस पिकस्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

राज्यात शेतकऱ्यांना उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी प्रेरणा मिळावी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि नवनवीन शेतकी प्रयोगांना प्रोत्साहन मिळावे यासाठी कृषी विभागामार्फत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होते तसेच त्यांचा अनुभव इतरांसाठी मार्गदर्शक ठरतो, यावरून राज्याच्या एकूण कृषी उत्पादनातही भर पडते.

'पिकस्पर्धा-२०२०' अंतर्गत रब्बी हंगाम २०२५ साठीही तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर पिकस्पर्धा राबविण्यात येणार आहे. रब्बी हंगाम २०२४ प्रमाणेच यंदाही ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पाच पिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आणि ती तो स्वतः कसत असणे आवश्यक, एका शेतकऱ्याला एकापेक्षा जास्त पिकांसाठी सहभाग घेता येईल, स्पर्धेतील पिकाखाली किमान ४० आर सलग लागवड आवश्यक आहे. अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : विहित नमुना अर्ज (प्रपत्र-अ), प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ व ८-अ उतारे, जात प्रमाणपत्र (आदिवासी गटासाठी), पिक क्षेत्राचा चिन्हांकित नकाशा आवश्यक आहे. अर्जाची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ आहे.

यासाठी प्रवेश शुल्क सर्वसाधारण गट : ३०० रूपये, आदिवासी गट : १५० रूपये असणार आहे.

राज्य पातळीवर पहिले बक्षीस - ५० हजार रूपये, दुसरे ४० हजार रूपये, तिसरे ३० हजार रूपये असणार असून जिल्हा पातळी : पहिले बक्षीस १० हजार रूपये, दुसरे ७ हजार रूपये, तिसरे ५ हजार रूपये. तालुका पातळी : पहिले बक्षीस ५ हजार रूपये, दुसरे ३ हजार रूपये, तिसरे २ हजार रूपये ठेवण्यात आले आहे. सर्व बक्षिसे सर्वसाधारण व आदिवासी गटांसाठी लागू राहतील.



हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता,** सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर** येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले. **प्रबंध संपादक : विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने,** दूरध्वनी ८८८८८४७२६८ stbaurangabadgmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. **( पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी)**

# हिंगोलीत राष्ट्रसेविका समितीच्या वॉकथॉन स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**

राष्ट्रसेविका समिती देवगिरी प्रांत यांच्यावतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या १६९ व्या जयंतीनिमित्त महिलांची मनकर्णिका वॉकेथर्न स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. यावेळी विजेत्यांना मान्यवरांच्याहस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

येथील शिवाजी नगर भागातील सिटी क्लब पासून दि ७ डिसेंबर रोजी वॉकेथॉन स्पर्धेला सुरूवात करण्यात आली. या स्पर्धेत सुमारे १२५ महिलांनी सहभाग घेतला होता. यामध्ये १८ ते ३५ वयोगटातील महिला आणि ३५ वर्षाच्या पुढील महिलांचा सहभाग होता. या स्पर्धेत काही महिलांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, इंदिरा गांधी चौक, महावीर चौक, गांधी चौक मार्गे सिटी क्लब असा तीन किलो मीटर पायी चालण्याची स्पर्धा होती. यामध्ये महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



राणी लक्ष्मीबाई यांची वेशभूषा परिधान करून सहभाग घेतल्याचे दिसत होते. सकाळी ७.३० वाजता सिटी क्लबपासून सुरू झालेल्या मनकर्णिका वॉकेथॉन स्पर्धेला देवगिरी प्रांतचे रमेश जाधव, प्रा आनंद भट्ट, श्रुती देशपांडे यांनी हिरवी झेंडी दाखवली.

त्यानंतर विजेत्यांना रमेश जाधव, प्रा आनंद भट्ट, श्रुती देशपांडे यांच्याहस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्हे तसेच पारितोषीकांचे वितरण करण्यात आले. प्रथम पारितोषीक ३१०० रूपये, द्वितीय २१०० रूपये, तर तृतीय ११०० रूपये पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच निबंध स्पर्धाही घेण्यात आली. विजेत्यांना पारितोषिक वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सीए विभावरी डुब्बेवार, रश्मी जोशी, दिपाली धाडवे, मिनाक्षी शिंदे, वर्षा देशमुख, रिना झंवर, रेणुका बंगाळे, निकीता झडपे, सविता बोराळकर, सोनल भरतीया, सुमन दुबे, दिपीका, आश्विनी बासटवार यांच्यासह राष्ट्रसेविका समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने बौध्द अनुयायी यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# मिनी ट्रॅक्टरसाठी बचत गटांनी अर्ज करावेत– गीता गुट्ठे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**

सामाजिक न्याय विभाग आणि विशेष सहाय्यक विभागांतर्गत सन २०२५–२६ साठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरविण्याच्या योजनेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी परिपूर्ण भरलेले अर्ज कार्यालयीन वेळेत सहायक आयुक्त समाज कल्याण, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे:

बचत गटाचे शासकीय नोंदणी प्रमाणपत्र, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (जिवनोन्नती अभियान), जिल्हा परिषद हिंगोली यांच्याकडील ऑनलाइन नोंदणी प्रमाणपत्र व सर्व सदस्यांची यादी किंवा कृषी विभागातील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), हिंगोली यांच्याकडून मिळालेले ऑनलाइन नोंदणी प्रमाणपत्र. गटातील सदस्यसंख्या किमान १० असणे बंधनकारक. गटातील ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत, तसेच सर्व सदस्यांचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. गटाचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे आवश्यक, बचत गटाचा पॅनकार्ड क्रमांक अनिवार्य, महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचा पुरावा म्हणून आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वी बचत गटाने किंवा गटातील कोणत्याही सदस्याने या योजनेचा लाभ घेतलेला नसल्याचे शपथपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुक बचत गटांनी निश्चित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गिता गुट्ठे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाची हिंगोली कार्यकारिणीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**



येथील ग्रामसेवक भवनात महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दि ७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती. यावेळी नूतन जिल्हा कार्यकारणीची निवड सर्वानुमते करण्यात आली.

या बैठकीत नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी अरूण बबनराव वाबळे, जिल्हा सरचिटणीसपदी सुरेशराव झिंझाडे, उपाध्यक्ष भुजंग सोनकांबळे, कोषाध्यक्ष रविशंकर पाटील, कार्याध्यक्ष संतोष मेनकुदळे, मानद अध्यक्ष मारोतराव कावरखे, महिला उपाध्यक्षा मनिषा हनुमंतराव मारकड, सहसचिव दत्ता निवृत्ती केंद्रे, महिला संघटक किरण नाथराव सरकटे, प्रसिध्दी प्रमुख गजानन अशोकराव बोरकर, राज्य कार्यकारणी सदस्य पल्लवी आनंदराव बोरकर, कायदेविषयक सल्लागार एम एन दळवी, राज्य कौन्सिलर गजाननराव जाधव, जिल्हा संघटकपदी अविनाश राजाराम झुंजारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी नूतन कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना जिल्हाध्यक्ष वाबळे यांनी सांगितले की, ग्रामसेवकांच्या विविध समस्या तसेच प्रलंबीत मागण्यांसाठी सदैव कार्यरत राहणार आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्याची कार्यकारणीही लवकरच जाहीर करण्यात येणार असून संघटनेच्या माध्यमातून काम करणार असल्याचे ते म्हणाले.




**हिंगोली– रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाची रविवारी राष्ट्रीय आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी रिपाईचे नेत्या डॉ कमलाताई गवई, डॉ राजेंद्र गवई, अमरजीत सिंग, रामदाव दाभाडे, अजितसिंग चहल, जकप्पा कांबळे, मधुकर मांजरमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सर्वोदय मंडळाकडून महामानवास अभिवादन

हिंगोली– नशामुक्त भारत अभियान समिती, 'व्यसनमुक्ती'चा प्रचार आणि प्रसार करणारे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त येथील स्मारक समितीच्या परिसरात, दि.६ शनिवारी अभिवादन करण्यात आले. नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, जिल्हा अध्यक्षा शुभदा सरोदे, व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल आदींनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विनम्र अभिवादन अर्पण केले. नशामुक्त भारत अभियान समिती, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशाबंदी मंडळाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. भारतीय संविधानातील, कलम ४७ चा व्यापक प्रमाणात प्रचार आणि प्रसार, व्यसनमुक्ती संकल्प, तंबाखूमुक्तीची शपथ, अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा, व्यसनमुक्ती प्रबोधन, तंबाखू–तंबाखुजन्य पदार्थ दुष्परिणाम, तंबाखूमुक्त शाळा अभियान राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

### संकष्ट चतुर्थीनिमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी



हिंगोली– नवसाला पावणारा हिंगोली शहरातील गड्डीपीर गल्लीतील श्री विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी रविवारी संकष्ट चतुर्थी निमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भाविकांनी दुर्वा, फुले तसेच नारळ घेवून दर्शनासाठी रांगेत उभे असल्याचे दिसत होते. शहरासह बाहेर जिल्ह्यातील भाविकांनी श्री विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी मंदिर प्रशासनाकडूनही चोख व्यवस्था करण्यात आली होती.

### दोन ठिकाणी जुगार अड्डयावर पोलिसांची धाड

हिंगोली– पोलिस दलाच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांतर्गत मटका, जुगार, अवैध वाळू वाहतुक तसेच अवैधदारू विक्री अशा अवैध धंदे करणाऱ्यांवर छापे मारण्यात येत आहेत. शनिवारी पोलिस दलाच्यावतीने जुगार कायद्यांर्गत दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. यावेळी आरोपीतांकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीताविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिस पुढील तपास करीत आहे. तसेच पोलिस विभागाच्यावतीने शनिवारी अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ वाहन चालकांविरूध्द जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यवाही करण्यात आली. या वाहन चालकांकडून पोलिसांनी १२ हजार रूपये दंड वसूल केला आहे.

# तेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाला उत्साहात सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ डिसेंबर**



वसमत तालुक्यातील दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तेलगाव येथे श्रीमद् भागवत कथा व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या उत्सवात तेलगाव येथे साजरा होत आहे भागवताचार्य श्री ह भ प प्रकाश महाराज बाबुळगावकर यांच्या रसाळ वाणीतून दररोज १२ ते ४ या वेळेत भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे.

यानिनिमित्त दररोज धार्मिक कार्यक्रम व कीर्तन सेवा दिनांक ह भ प मनोहर महाराज, ह भ प मुकुंद महाराज, ह भ प काशिनाथ महाराज, ह भ प माणिक महाराज रेंगे, यादव महाराज डाखोरे प्रकाश महाराज साखरे, कल्याण महाराज वारे दि ११ डिसेंबर रोजी काल्याचे किर्तन ह भ प त्र्यंबक महाराज दस्तापुरकर यांचे होईल व नंतर महाप्रसाद होईल देवाची भव्य मिरवणूक गावामध्ये निघणार आहे तरी या भागवत कथेचा व किर्तन सेवेचा व महाप्रसादाचा गावकरी मंडळी व पंचक्रोशीतील भक्तमंडळी यांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्यावतीने करण्यात आले आहे. गायनाचार्य संतोष महाराज तेलगावकर, ओमकार महाराज तेलगावकर, मृदुंगाचार्य मदन रमेश कानडे, बापूराव राऊत, माजी सरपंच ईश्वर कानडे व समस्त गावकरी मंडळी परिश्रम घेत आहेत.

# क्षुल्लक कारणावरून एकाच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटविले, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**

शहरातील जिजामाता नगर भागातील चौकामध्ये एका व्यक्तीच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिल्याची घटना घडली आहे. भाजलेल्या अवस्थेत व्यक्तीला उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले असून याप्रकरणी दोधांवर रविवारी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून दुसऱ्याचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील जिजामाता नगरातील प्रकाश सरगड व गजानन वाघमारे हे एकाच गल्लीत राहतात. दोन दिवसांपूर्वी तू मला जोरात का बोलला या कारणावरून गजानन याने प्रकाश सरगड यांच्यासोबत वाद घातला होता. शाब्दीक चकमकीनंतर वाद मिटला होता. मात्र गजानन याच्या मनात प्रकाश यांच्याबद्दल राग कायम होता.

दरम्यान, शनिवारी सायंकाळच्या सुमारास प्रकाश हे जिजामाता नगर भागातील चौकामध्ये उभे होते. यावेळी दुचाकीवर आलेल्या गजानन व त्याचा मित्र गोलू पुंडगे यांनी पुन्हा एकदा प्रकाश यांच्याशी वाद सुरू केला. त्यानंतर गोलू याने प्रकाश यांचे हात धरले तर गजानन याने बाटलीत आणलेले पेट्रोल प्रकाश यांच्या अंगावर ओतून पेटवून दिले. दोघांनी त्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. अचानक णालेल्या या हल्ल्यामुळे प्रकाश घाबरून गेले. त्यांनी प्रसंगावधान राखत प्रकाश यांनी त्यांच्या गळ्यातील रूमाल काढून फेकून दिला. मात्र यामध्ये त्यांची मान भाजली.

या घटनेची माहीती मिळताच पोलिस निरीक्षक संदीप मोदे, उपनिरीक्षक राहुल महीपाळे, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संजय मार्के, संतोश करे, गणेश लेकुळे, गणेश वाबळे, शंकर ठोंबरे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन जखमी प्रकाश यांना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले. याप्रकरणी प्रकाश यांच्या तक्रारीवरून गजानन आणि गोलू यांच्याविरूध्द जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसानी शोध करून यातील आरोपी गजानन यास माळधामणी येथून अटक केली आहे.

# पैशाच्या कारणावरून प्राणघातक हल्ला तिघांविरूध्द सेनगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**



सेनगाव शहरानजीक येलदी टी पॉईंटजवळ पैशाच्या कारणावरून एकावर तलवार आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली असून याप्रकरणी सेनगाव पोलिसांत तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील मारहाणीमागे अवैध वाळू उपसा व वाहतुक हे कारण असल्याचे दिसत आहे.

सेनगाव तालुक्यात मागील अनेक वर्षापासून वाळू माफीया चांगलाच फोफावला आहे. त्यातून वसुली आणि गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असून वाळू माफीया आणि त्यांचे पाळलेले गुंड भरदिवसा प्राणघातक हल्ला करीत असल्याच्या घटना घडत आहे. आपले वर्चस्व सिध्द करण्यासाठी या टोळ्या एकमेकांवर आता हल्ले करू लागल्याने पोलिसांसमोर आव्हान उभे राहीले आहे. पूर्णा नदीच्या पात्रातून बिनधास्तपणे वाळू उपसा करून अवैध वाळू वाहतुक होत आहे परंतु महसूल प्रशासन मुग गिळून गप्प बसले आहे.

दि ५ डिसेंबर रोजी सेनगाव शहरानजीक असलेल्या येलदरी टी पॉईंट जवळ शेकुराव बाजीराव गडदे रा चिखलागार यांची कार अडवून दिलीपसिंग, गौतम जाधव, रोशण उर्फ गोलू कुऱ्हे सर्व रा सेनगाव यांनी तु आठ दहा दिवसापूर्वी बोरकर यांना दिलेले दहा हजार रूपये परत का मागितले या कारणावरून शिवीगाळ करीत तलवार आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केला आहे. तसेच सेनगावला आला तर जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी शेकुराव गडदे यांनी सेनगाव पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास उपनि रविकिरण खंदारे हे करीत आहेत.

जिल्ह्यात वाळू माफीयांनी हैदोस घातला असून यावर कायमस्वरूपी उपाय करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# फिजीक्स वल्लाहच्यावतीने आयोजित कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ डिसेंबर**

येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात दि ७ डिसेंबर रोजी फिजीक्स वल्लाह यांच्यावतीने विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी संस्थाचालक गजेंद्र बियाणी, पंडीत अवचार, गोवर्धन वीरकुंवर, कुलदीप मास्ट, फिजीक्स वल्लाहचे संचालक यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावीनंतर कोणती शाखा निवडावी तसेच अभ्यास कसा करावा, करिअर कसे घडवावे याबद्दल मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक यांची उपस्थिती होती.

# रामतिर्थ ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांचा 'स्फोट!

## पोलीस, उत्पादन शुल्क विभागावर संगनमताचे आरोप

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ७ डिसेंबर-**

नायगांव तालुक्यातील नरसीपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या रामतिर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे अक्षरशः बोकाळले असून, याकडे पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने खुले आमपणे डोळेझाक करीत असल्याचे चित्र स्थानिक नागरिकांच्या अनुभवातून समोर येत आहे.

ठाण्याच्या हद्दीत अनेक ढाबे व हॉटेल्समध्ये विना परवाना दारू व शिंदी विक्री बेधडक सुरू असल्याचे नागरिकांनी सांगितले. दुसरीकडे नरसीच्या पश्चिम दिशेला असलेल्या गायरान जमिनीच्या जवळील क्रेशर परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि विनापरवाना ब्लास्टिंग सुरू असून, या स्फोटां मुळे परिसरातील गरीब कुटुंबांच्या घरांना तडे जाऊ लागले आहेत.ग्रामस्थांनी दिलेल्या माहिती नुसार, या गंभीर परिणामांनंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस उपाय योजना हाती घेतलेली नाही.

स्थानिकांच्या मते, गेल्या काही वर्षांपासून रामतिर्थ पोलीस ठाणे हे अवैध व्यवसायांचे 'माहेरघर' बनल्या प्रमाणेच परिस्थिती निर्माण झाली आहे. अवैध दारूविक्री, खनिज उत्खनन, ब्लास्टिंग यांसारखे धंदे थांबवण्या ऐवजी, काही पोलीस कर्मचारी कथित हप्ते वसुलीत रमल्यामुळे संपूर्ण कायदा व सुव्यवस्था ढासळली असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.त्यांच्या म्हणण्यानुसार, हप्तेवसुलीमुळेच अवैध धंद्यांना मोकळे रान मिळत असून, उत्पादन शुल्क विभागाचे नियंत्रणही फक्त कागदोपत्रीपुरतेच मर्यादित राहिले आहे.

अलीकडेच याच ठाण्याच्या हद्दीत झालेल्या लाच लूचपत विभागाने घातलेल्या धाडीत नाहकपणे पोलीस कर्मचाऱ्यावर रामतिर्थ ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून.पोलीस कर्मचाऱ्यात सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र अशी गंभीर घटना घडूनही, संबंधित खात्यांनी केवळ काही कर्मचाऱ्यांची नियंत्रण कक्षात बदली करून वेळ मारून नेली, अशीही चर्चा आहे.मूलभूत समस्या तशाच राहिल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी नाराजी पसरलेली दिसून येते. स्थानिकांचा स्पष्ट सवाल आहे अवैध धंदे मोकाट, स्फोटांचे हादरे कायम आणि पोलीस हप्ते वसूल करण्यात मग्न असतील, तर आमच्या सुरक्षेची हमी कोण देणार?या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून रामतिर्थ हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर अंकुश आणावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# शॉर्ट सर्किटच्या आगीत घर जळून खाक;लाखोचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. ७ डिसेंबर-**

सगरोळी येथे कौलारू घराला विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीच्या भडक्यात रहात्या घरासह कपाटातील दाग दागिने, नगदी रोकड व संसार उपयोगी साहित्याची राख रांगोळी झाल्याची घटना आज शनिवार रोजी दुपारच्या सुमारास घडली आसुन यात जवळपास विस ते पंचविस लाख रुपयाचे नुकसान झाल्या चा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सगरोळी येथे शनिवार रोजी गावातील मध्यभागी वस्तीत असलेल्या कौलारू घराला विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत येथील शेतकरी कुटुंबातील हनुमंत दिगंबर सिद्धापुरे, बळवंत बाबाराव सिद्धापुरे, मारोती बापूराव सिद्धापूरे, रेणुकाबाई बालाजी सिद्धापुरे, यांच्या रहात्या कौलारु घरास आज दि.६ डिसेंबर शनिवार रोजी दुपारी बाराच्या सुमारास लागलेल्या आगीत हनुमंत सिद्धापुरे या शेतकऱ्यांच्या घरातील कपाटामध्ये नुकतच सोयाबीन विक्री करून ठेवलेली आडीच लाख नगदी रोकड व मौल्यवान दाग दागिन्यासह संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याचे समजले. तर शेजारील अन्य शेतकऱ्यांच्या घरातील संसार उपयोगी साहित्य व अन्नधान्य व कौलारू घर यात जळून खाक झाले.

आग आटोक्यात आणण्यासाठी गावकऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न केले, पण ही आग आटोक्यात येत नसल्याने तात्काळ बिलोली येथिल अग्निशामक वहानास फोनवर संपर्क साधून बोलावल्यामुळे दोन तासा नंतर ती आग आटोक्यात आली. या आगीत सदरील शेतकरी कुटुंबाच्या घरासह मोठ्या प्रमाणात साहित्याचे व अन्नधान्याचे मोठे नुकसान झाले. असून यात जवळपास विस ते पंचविस लाख रुपयाचे नुकसानीचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीमुळे उघड्यावर पडलेल्या शेतकरी कुटुंबांना शासनाकडून तात्काळ अर्थिक मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांसह शेतकरी वर्गातून होत आहे. तर ही आग आटोक्यात येण्यासाठी येथील बिट जमादार आंबेराय सी. व्हि, पोलीस कर्मचारी शेख शबीर, राजू पाटील शिंपाळकर, शंकर महाजन, प्रभू मुत्येपोड, वैभव भोसले, शेख मुर्तुज, भगवान पा. सिध्दापुरे, सुनिल खिरप्पवार अरविंद बुच्छलवार, सतीश बुच्छलवार, आदिनाथ बाबणे, कोंडापल्ली शंकर, विकास दमय्यावार, सचिन कल्लोड, सचिन बुच्छलवार, विठ्ठल चुन्नमवार, संजय चून्नमवार यांच्यासह शेकडो गावकऱ्यांनी सहकार्य केल्याने ही लोकवस्ती दाट आसल्याने पुढील मोठा अनर्थ टळला.

## शैक्षणिक क्रांती हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली : रामभाऊ जाधव

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

शिक्षण हे सर्वात शक्तीशाली शस्त्र असून त्याचा अचूक वापर करून शैक्षणिक क्रांती केल्यास प्रत्येकाच्या जीवनाचे सोने झाल्याशिवाय राहत नाही, आंबेडकरी विचार हा परीसस्पर्श असून त्याचे जीवनात अनुकरण केल्यास जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध होते, असे विचार कन्या ताडकळस केंद्राचे केंद्रप्रमुख रामभाऊ जाधव यांनी व्यक्त केले. ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महातपूरी येथे आयोजित महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

शालेय विद्यार्थ्यांसमोर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा जागर घालून विद्यार्थ्यांना जागृत केले. यावेळी शितल सोनकांबळे, संघरत्न सोनकांबळे यांनी बाबांसाहेबाप्रती आपल्या भाषणातून कृतज्ञता व्यक्त केली. सलोनी कस्तुरे या विद्यार्थीनीने शेरोशायरीतून अभिवादन करून सर्वांचे लक्ष वेधले. संजीवनी सोनकांबळे, आर्यन एडके यांनी आंबेडकरी गीते सादर करून अभिवादन केले.

# धोकादायकक्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी शिष्यवृत्ती योजना

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्यामार्फत जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात साफसफाई व आरोग्यास धोकादायकक्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी भारत सरकार मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेचा संबंधित पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी केले आहे.

हाताने मेहतर काम करणाऱ्या/ मानवी विष्ठाचे व्यक्तीचे वहन करणाऱ्या व्यक्ती. बंदिस्त व उघड्या गटाराची साफसफाई करणाऱ्या व्यक्ती. मेलेल्या जनावरांची कातडी कमावणारे आणि कातडी सोलणारे. कचरा गोळा करणारे, उचलणारे. मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स ऍक्ट २०१३ मधील सेक्शन २(१)(व) नुसार धोकादायक सफाई व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनिवासी, स्थानिक विद्यार्थ्यांसाठी वार्षिक रुपये ३ हजार ५०० तसेच इयत्ता ३ री ते १० वीमध्ये शिकणाऱ्या निवासी (शिक्षणासाठी बाहेरगावी राहात असलेले) विद्यार्थ्यांना वार्षिक रुपये ८ हजार रुपये शिष्यवृत्ती रक्कम अदा करण्यात येते.

या योजनेसाठी पालक हे उपरोक्त नमूद अस्वच्छ, साफसफाई क्षेत्रात व्यवसाय करीत असल्याबाबत पुढील प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत क्षेत्र:- ग्रामसेवक व सरपंच. नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्र:- मुख्याधिकारी. महानगरपालिका क्षेत्र:- आयुक्त / उपायुक्त. सदरील प्रमाणपत्राचा विहित नमुना सर्व नगरपालिका व गटशिक्षणाधिकारी,गट साधन केंद्र यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**अर्ज करण्याची पद्धत**

सदरील योजनेसाठी अर्ज करण्याकरिता विद्यार्थी ज्या शाळेत शिकत आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी महाडीबीटी पोर्टल प्रणालीच्या ु. ीशिरींीळल.रहरळीं.ीस या संकेतस्थळावर ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरावयाचे आहे. सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुख्याध्यापक यांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र व पालकाचे हमीपत्र पोर्टलवर अपलोड करावयाचे आहे. सदर योजना स्वयं अर्थसहाय्यित शाळेसाठी लागू नाही. तसेच विद्यार्थ्याला फक्त एकाच मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येईल.

सदरील योजना सर्व जाती धर्माच्या व्यक्तींसाठी लागू आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही उत्पन्नाची अट नाही. विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती किमान ७५ टक्के असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्ती च्या लाभची रक्कम पालकांच्या आधार संलग्नीत बँक खात्यावर दोन हप्त्यामध्ये जमा करण्यात येते. साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती ही योजना राबविण्यात येते, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी दिली.

## जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदी डॉ. राठोड तर कार्याध्यक्षपदी भिलवंडे

**नरसी** -नांदेड जिल्हा काँग्रेसमध्ये मोठ्या हालचाली होत असून, संघटनात्मक फेरबदलाच्या माध्यमातून जिल्ह्यातील राजकीय पटलावर




नवे शक्तीसमिकरण उभे राहत असल्याचे चित्र आहे. जिल्हा सरचिटणीसपदी डॉ. मधुकरराव राठोड, तर कार्याध्यक्षपदी संभाजी पाटील भिलवंडे या दोन दमदार, प्रभावी आणि तडफदार नेतृत्वाची निवड केली असल्याने कार्यकर्ते, पदाधिकारी , नेते अभिनंदन करून शुभेच्छा देत आहेत. मरवाळी तांडा येथील लोकप्रिय सरपंच डॉ. मधुकरराव राठोड आणि नरसीच्या राजकीय परंपरेतून घडलेले सभांजी हानमंतराव पाटील भिलवंडे यांची जिल्हा पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये असलेली त्यांची मजबूत पकड आणि राजकीय जम लक्षात घेऊनच काँग्रेसने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली असल्याचे समजते. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रवींद्र पाटील चव्हाण, जिल्हाध्यक्ष हणमंतराव बेटमोगरेकर, वरिष्ठ नेते राजेश पावडे, श्रीनिवास पाटील चव्हाण, उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, जब्बार खान यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दोन्ही नेत्यांचे अभिनंदन केले. येत्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची सर्वसमावेशक प्रतिमा अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष संघटन अभियान राबविण्याचा संकल्प नवीन जिल्हा कार्याध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे आणि जिल्हा सरचिटणीस डॉ. मधुकरराव राठोड यांनी व्यक्त केला.

## महामानव डॉ.आंबेडकरांना पणती ज्योत रॅलीने अभिवादन

**नांदेड** -प्रज्ञा करुणा विहार समिती व रमामाता महिला मंडळ देगावचाळ नांदेड येथील नागरिकांनी पणती ज्योत रॅली काढून विश्वरत्न



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महपरिनिरवान दिनानिमित्त रॅली काढून अभिवादन करण्यात आले. सदरील रॅलीस प्रज्ञा करुणा विहार येथून प्रारंभ होऊन ती वजिराबाद, शिवाजी पुतळा मार्गे जाऊन रेल्वेस्टेशन परिसर येथे विसर्जित करण्यात आली. सर्वांनी डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले.या रॅलीत मोठया प्रमाणात महिला, पुरुष व बालके यांचा समावेश होता. रॅलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर रहे!जबतक सूरज चाँद रहेंगा!बाबा तुम्हारा नाम रहेंगा!या घोषणा देण्यात आल्या. वाहनावर डॉ. आंबेडकरांची मोठी प्रतिमा होती. प्रत्येकाच्या हातात पणती ज्योत होती.रॅलीच्या यशस्वीतेसाठी माजी नगरसेवकाचे प्रतिनिधी रमेश गोडबोले, भगवान येवले, सुभाष लोखंडे, इंजि. सुनिल हाटकर सिद्धार्थ ढेपे, निर्मलाबाई पंडित, रेखाबाई हिंगोले, शिल्पा लोखंडे, जोत्स्ना गोडबोले, प्रतिभा गोडबोले यांच्यासाह आदिनी परिश्रम घेतले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## प्रतिक मोटर ड्रायव्हिंग स्कूलतर्फे मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण शिबीर

**नांदेड** -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने समाजातील होतकरू तरुण व तरुणींसाठी एक दिवसीय मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले .या शिबीरा मध्ये १०० च्या वर तरुण तरुणींनी सभाग नोंदविला. या शिबीरात गाडी चालवणे, लायसन्स काढणे, रोडवरील नियम इ. संबंधात तज्ञांकडून मोफत मार्गदर्शन व मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण दिले. या शिबिराचे उदघाटक पो.नि. संतोष जोंधळे . प्रमुख पाहुणे म्हणून बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष व रिपाई (आठवले ) चे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष सुखदेव चिखलीकर हे होते . ह्या वेळी जयपाल चिखलीकर, राजेश चौदंते .अरुण चिखलीकर, नितीन देडे ,रवी चिखलीकर., किरण चित्ते ,शुभम जोंधळे.संतोष दुन्डे ,किरण वाघमारे. अमोल राऊत. आदित्य सोनुले. यश चिखलीकर. लकी चिखलीकर.आदींची उपस्थति होती . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैभव चिखलीकर यांनी प्रयत्न केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ७ डिसेंबर-**

विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त किनवट शहरातील शिवाजी नगर भागात आज (ता.६) सकाळी १० वाजता अभिवादन कार्यक्रम अत्यंत श्रद्धा, भावनिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उभारलेल्या मंचापुढे उभी राहिलेली भीमअनुयायांची गर्दी आणि पुतळ्याजवळ ओसंडून वाहणारा भाविकांचा जनसागर यामुळे परिसर निळ्या विचारांनी निनादून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. आ. भीमराजी केराम, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष अभियंता प्रशांत ठमके, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष साजिद खान, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, माजी उपनगराध्यक्ष वेंकट गोपाळराव नेम्मानिवार, रिपाइं चे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष दादाराव कयापाक, प्राचार्या शुभांगीताई ठमके, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, सेक्युलर मुव्हमेंट चे जिल्हाध्यक्ष ड. मिलिंद सर्पे, पीरिपा चे जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, मंडळ अध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे पाटील, प्राचार्य आनंद भालेराव, दीपक ओंकार, ड. सम्राट सर्पे, निखिल कावळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून महामानवांना अभिवादन केले.

यावेळी महेंद्र नरवाडे व अनिल उमरे यांनी सामुदायिक वंदना घेतली. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी केले. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने परिसरात केलेल्या उत्कृष्ट व्यवस्थेमुळे भाविकांना कोणताही अडथळा आला नाही.



महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवाजी नगरासह संपूर्ण शहरात भीमरूपी भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊन कृतज्ञतेने अभिवादन केले. याच निमित्ताने युवा पँथर संघटनेतर्फे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुणांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान करून समाजसेवेचा संदेश दिला. शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.

कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी आणि निळ्या प्रेरणेने भारलेला दिसत होता.

## विद्यापीठात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ डिसेंबर-**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्रात, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर सर, प्र-कुलगुरू आदरणीय डॉ. अशोक महाजन, तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन प्रमुख उपस्थित होते.

यावेळी देवदत्त जोशी व शुभम स्वामी, अधिसभा सदस्य युवराज पाटील, शिवाजी चांदणे, यांची यांची विशेष उपस्थिती होती. तसेच डॉ. एम. के. पाटील, डॉ. रवि एन. सरोदे, अध्यासन केंद्राच्या संचालिका डॉ. सुनिता पाटील , राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारूती गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, रामदास पेद्देवाड, तसेच कर्मचारी संघटनेचे नेते काळबा हनवते यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठामध्ये कबड्डी स्पर्धेला उत्साहपूर्ण सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सुरू असलेल्या २७ व्या महाराष्ट्र आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत कबड्डी क्रीडा प्रकारातील उपांत्यपूर्व सामन्यांना आज सुरुवात झाली. राज्यातील आघाडीच्या विद्यापीठांच्या पथकांमध्ये चुरसपूर्ण लढती रंगण्याची अपेक्षा आहे.

कबड्डी (मुले) उपांत्यपूर्व पहिला सामना वारणा विद्यापीठ, वारणानगर विरुद्ध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दुसरा सामना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विरुद्ध मुंबई विद्यापीठ, मुंबई, तिसरा सामना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, चौथा सामना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यात होणार आहे. प्रत्येक सामन्यात खेळाडूंचे कौशल्य, चपळाई आणि रणनीतीची तीव्र चुरस अपेक्षित असून मैदानावर थरारक वातावरण निर्माण होणार आहे.

कबड्डी (मुली) उपांत्यपूर्व पहिला सामना मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुद्ध यजमान स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, दुसरा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विरुद्ध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, तिसरा सामना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध वारणा विद्यापीठ, वारणानगर, चौथा सामना एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई विरुद्ध कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांच्यात होणार आहे. गटपातळीवर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या संघांसाठी ही सामने उपांत्य फेरीत मजल मारण्यासाठी निर्णायक ठरणार आहेत.

# नव्याने रुजू झालेले पो. नि. गणेश कराड यांचा मांडवा गावात दौरा; गावकऱ्यांना मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ७ डिसेंबर-**

किनवट पोलिस स्टेशनचे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी मौजे मांडवा येथे भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. मांडवा गावातील अवैध दारूविक्री, परस्परांतील वादविवाद तसेच विविध स्थानिक अडचणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कराड यांनी महिलांना आणि ग्रामस्थांना सुरक्षिततेबाबत विशेष दिलासा देत आवश्यक ती कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा सौ. सागरताई शिंदे-पाटील या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून पी.आय. गणेश कराड उपस्थित होते.




या वेळी मांडवा बिटचे जमादार पुरी साहेब, प्रकाश बोधनकर तसेच पोलिस कर्मचारी उपस्थित होते. मंचावर ग्रामसेवक आरमाळकर, सरपंच सौ. सुनिता आत्राम, रामू धर्वे, राजू मेसावार, बालाजी गिटे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला-पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावकऱ्यांनी पोलिस प्रशासनाशी मुक्त संवाद साधत विविध समस्या मांडल्या. कराड यांनी त्या लक्षपूर्वक ऐकून तातडीने निराकरण करण्याचे आश्वासन दिल्याने गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जुना मोंढ्यातील ऐतिहासिक घडीसाठी तीव्र आंदोलन करणार : वाघदरीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ७ डिसेंबर-**

शहराच्या ऐतिहासिक ओळखीचा अविभाज्य भाग ठरलेल्या जुना मोंढा (टॉवर) येथील बंद घडी पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी केलेली सातत्यपूर्ण मागणी आता वेगाने गती पकडताना दिसत आहे. शहरातील नागरी, सामाजिक व शहरी प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणारे आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे कार्य सातत्याने पार पाडणारे पत्रकार वागदरीकर यांनी मागील काही



महिन्यांपासून या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे.

ऐतिहासिक घडी दीर्घकाळ बंद असल्याने शहराच्या सांस्कृतिक वारशाची ओळख धूसर होत चालली होती. घडीचे नियोजित पुनरुज्जीवन हे केवळ संरक्षक दृष्टीने नव्हे, तर नांदेडच्या परंपरेचा सन्मान राखण्यासाठी अत्यावश्यक असल्याची भावना नागरिकांतही व्यक्त होत आहे.

पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी मनपा आयुक्तांकडे अनेकवेळा लेखी निवेदने सादर करून घडी कार्यान्वित करण्याची मागणी केली. या मागणीला नागरिक, प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी व स्वयंसेवी संस्थांकडूनही व्यापक पाठिंबा मिळू लागला आहे. यावर तात्काळ निर्णय घेऊन ऐतिहासिक घडी पुन्हा सुरू करण्याची प्रक्रियेची मनपा प्रशासनाने गतीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांमध्ये जोर धरत आहे.

दरम्यान, या मागणीवर तातडीने निर्णय न झाल्यास प्रस्तावित उपोषणाला सज्ज असल्याचा इशारा पत्रकार वागदरीकर यांनी प्रशासनाला दिला असून, आम्हीही त्यांच्या उपोषणाला साथ देऊ, असे नागरिकांकडून स्पष्टपणे सांगितले जात आहे.